शनिवार
१३
जून २०२६

पुणे
पाने : ४
अंक : ३१५
वर्ष : ५
किंमत : रू.३/-

मुख्य संपादक : डि.एस.लोखंडे पाटील
epaper.chaluwartha.com
www.chaluwartha.com
RNI No.: MAHMAR/2021/82895

# दैनिक चालु वार्ता

पंतप्रधानांच्या १२ वर्षांच्या कार्यपूर्ती पत्रकार परिषदेत पालकमंत्री व खासदारांची बोलती बंद

(बातमी.... पान क्रमांक २ वर )

पुणे ✻ नांदेड ✻ छ.संभाजीनगर ✻ बीड ✻ परभणी ✻ हिंगोली ✻ जालना ✻ लातूर ✻ धाराशिव ✻ मुंबई ✻ पालघर ✻ ठाणे ✻ रायगड ✻ रत्नागिरी ✻ अहमदनगर ✻ सोलापूर ✻ सातारा ✻ सांगली ✻ अमरावती ✻ कोल्हापूर ✻ गडचिरोली ✻ यवतमाळ ✻ नाशिक ✻ वर्धा ✻ वाशिम ✻ चंद्रपूर

# देशावर दुष्काळाचे संकट !

## पंतप्रधान मोदी यांनी एल निनोच्या धोक्यात केले मोठे आवाहन

## मॉन्सूनसाठी धोक्याची घंटा...

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** प्रशांत महासागरात एल निनो सक्रिय झाला. देशात मॉन्सून लांबणीवर पडला. १९५० नंतर पहिल्यांदाच सर्वाधिक तीव्र स्वरूपाचा एल निनो राहण्याचा मोठा अंदाज वर्तवण्यात आला. प्रशांत महासागरातील न्यूट्रल स्थिती जाऊन एल निनो निर्माण झाल्याची घोषणा अमेरिकी हवामानशास्त्र संस्था नोआने केल्याने एकच खळबळ उडाली.

भारतात या एल निनोचे गंभीर परिणाम बघायला मिळतील. एक तर अति पाऊस किंवा अती उन्ह पडू शकते. देशासमोर एस निनोचे संकट आहे. डिसेंबर महिन्यात हा एल निनो अति तीव्र होण्याचा अंदाज आहे. १९५० नंतर पहिल्यादांच हा इतका जास्त तीव्र होतोय. देशातील मॉन्सूनवर याचा परिणाम पडेल. शेवटी ज्याची भीती होती तेच झाले. गुरूवारी एल निनो प्रशांत महासागरात सक्रिय झाल्याची घोषणा



क्लायमे प्रेडिक्शन सेंटरने केली.

मुळात म्हणजे एल निनोचा सर्वाधिक परिणाम हा मॉन्सूनवर होतो. एल निनोमुळे सरासरीपेक्षा मॉन्सून कमी होऊ शकतो. राज्यातही मॉन्सून अद्याप दाखल झाला नाही. शेतकरी पेरणीकरिता मॉन्सूनची वाट पाहत आहेत. एल निनो प्रशांत महासागरात सक्रिय झाल्याने त्याचा परिणाम देशातील मॉन्सूनवर होईल. याची तीव्रता डिसेंबरमध्ये सर्वाधिक असेल. मॉन्सूनच्या पावसात याचा अडथळा निर्माण होऊ शकतो. भारतातील काही राज्यात मॉन्सून कमी पडण्याचा अंदाज आहे. एल निनोचा थेट मॉन्सूनवर परिणाम दिसतोय. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवन सांस्कृतिक केंद्रात नीती आयोगाच्या ११ आयोगाची बैठक घेतली. नरेंद्र मोदी यांनी एल निनोच्या स्थितीचा धोक्याचा इशारा दिला. जलसंधारणासाठी अधिक कठोर उपाययोजना करण्याबाबत त्यांनी आवाहन केले. मोदींनी राज्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे निर्माण झालेल्या संधींचा लाभ घेण्याचे आवाहन केले. थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एल निनोचा धोका आणि राज्यांना इशारा दिला. ज्यामुळे एल निनोचे किती मोठे संकट देशापुढे आहे, याची कल्पना होऊ शकते. जगभरातून भारताला एल निनोचा इशारा दिला जात आहे. देशातील अनेक राज्य एल निनोच्या कचाट्यात येत आहेत. जिथे मोठा दुष्काळ पडू शकतो. मॉन्सूनचा पाऊस अत्यंत कमी पडण्याचा अंदाज आहे.

## देश विदेश थोडक्यात

### इराण स्ट्रेट ऑफ होर्मुझ उघडणार ?

### अमेरिकेशी या १४ मुद्यांवर होणार शांततेच्या वाटाघाटी...



दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** अमेरिका आणि इराण दरम्यान प्रस्तावित शांतता कराराच्या अटींचा खुलासा झाला आहे. इराणच्या अर्ध सरकारी वृत्तसंस्था मेहर न्यूज एजन्सीच्या मते कराराच्या ड्राफ्टमध्ये एकूण १४ महत्वाच्या पॉईंट्सचा समावेश आहे. सर्वात पहिला मुद्दा सर्व आघाड्यांवरील युद्धाला तातडीने आणि कायम स्वरुपी थांबवण्याचा आहे. यात लेबनॉनशी सुरु असलेल्या संघर्षांचा देखील समावेश आहे. सामजंस्य करारात हा देखील प्रस्ताव आहे की होर्मुझ स्ट्रेटला ३० दिवसांच्या आत उघडले जाईल, मात्र तिचे संचलन इराणच्या नेतृत्वाखाली होईल असे करारात स्पष्ट केले आहे.

शांतता कराराच्या मसुद्यानुसार अमेरिका इराणच्या अंतर्गत बाबीत दखल करणार नाही आणि त्याच्या सार्वभौमत्वाचा सन्मान करेल. तसेच अमेरिकेला ३० दिवसांच्या आता नौदलाची नाकाबंदी हटवावी लागेल आणि इराणच्या आजूबाजूला तैनात सैन्यात कपात करावी लागेल. मेहर न्यूज एजन्सीने इराणी शांतता टीमच्या जवळील सूत्रांच्या हवाल्याने ही माहिती दिली आहे. मात्र, या अटी आणि शर्थींना अद्याप अमेरिका किंवा इराण याने दुजारो दिलेला नाही. रिपोर्टच्यानुसार कराराचा ड्राफ्ट अजून अंतिम झालेला नाही. या ड्राफ्टला इराणच्या शीर्षस्थ नेतृत्वाकडून मंजूरी मिळणे बाकी आहे.

**तेल निर्बंध हटविण्याचा उल्लेख**

याशिवाय इराणी तेलावर अमेरिकेने लावलेले निर्बंध देखील हटवणे वा निलंबित करण्याचा उल्लेख या शांतता करारात केलेला आहे. बातमीनुसार अमेरिका आणि त्याच्या सहकारी देशांनी इराणच्या पुनर्निर्माणसाठी किमान ३०० अब्ज डॉलरची योजना तयार करावी. तसेच दोन्ही देश अणू कार्यक्रम आणि सर्व आर्थिक निर्बंध हटवण्याबद्दलच्या मुद्द्यांवर अंतिम करार करण्यासाठी ६० दिवस चर्चा करतील.

**आण्विक शस्त्रास्रे न बनवण्याची हमी**

या शांतता मसुद्यात इराणने पुन्हा हमी दिली आहे की तो अण्वस्त्र तयार करणार नाही. त्या बदल्यात अमेरिका चर्चे दरम्यान क्षेत्रात आपले सैन्य ताकत वाढवणार नाही आणि इराणवर कोणतेही नवे प्रतिबंध लादणार नाही.

करारानुसार इराणच्या २४ अब्ज डॉलरच्या गोठवलेला फंड रिलीज करण्याचाही प्रस्ताव आहे. तसेच कराराच्या पालन होत आहे की नाही त्याची पाहणी करण्यासाठी एक विशेष तंत्र स्थापन केले जाईल. अंतिम

(पान ३ वर...☛ )

## ४० लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीचा विनाअट लाभ पण...

### जिल्हा सहकारी बँकांसाठी एक अट ठेवली; देवेंद्र फडणवीस यांनी कारण सांगून टाकलं !

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १२ वर्ष पंतप्रधान पदाची कारकिर्द पूर्ण केलीय. हे करत असताना ४ हजार ३९८ दिवस हा लॉगेस्ट इलेक्टेड पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांचा विक्रम मोडला. या निमित्तानं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांनी महाराष्ट्र सरकारनं जाहीर केलेल्या पीक कर्जमाफीसंदर्भात माहिती दिली आहे.

**कर्जमाफीत फक्त एक अट**

कर्जमाफी आम्ही केलेली आहे, या कर्जमाफीमध्ये कुठल्याही अटी आणि शर्थी आम्ही टाकलेल्या नाहीत. एकच अट आम्ही टाकलेली आहे ती महाराष्ट्रातील बँकिंग यंत्रणा आहे, त्यातल्या त्यात जिल्हा सहकारी बँका टिकल्या पाहिजेत, यासाठी ती अट टाकली आहे. ज्यांना वारंवार माफी मिळालेली आहे, त्यांच्याकरता आम्ही यावेळी माफी करणार आहोत. मात्र, ती एका फिक्स रकमेपर्यंत त्यांची माफी



करणार आहोत, उरलेले पैसे त्यांनी भरायचे आहेत. अन्यथा आपली बँकिंग यंत्रणा पूर्णपणे उद्धवस्त होईल.

बाकी ४० लाख शेतकऱ्यांना विना अट कर्जमाफीचा फायदा मिळणार आहे. आम्ही कर्जमाफी संदर्भात एक उपसमिती तयार केलीली आहे. मी आणि दोन्ही उपमुख्यमंत्री आणि इतर काही मंत्र्यांचा त्यात समावेश असेल. ही कर्जमाफी जशी पुढं जाईल त्यातील अडचणी समोर येतील, त्या अडचणी सोडवण्याची जबाबदारी या उपसमितीची असेल. कुठल्याही निवडणुका समोर नसताना ही कर्जमाफी केलेली आहे. विरोधी पक्षांनी कोणतीही ठोस मागणी न करता केलेली कर्जमाफी आहे. शासनानं स्वत: केलेली

(पान ३ वर...☛ )

## NEET ची होणार पुन्हा परीक्षा !

### NTA चा मोठा निर्णय; विद्यार्थ्यांना मिळणार 'या' सुविधा...

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** NEET परीक्षांच्या उडालेल्या गोंधळानंतर NTA ने मोठा निर्णय घेत, पुन्हा होणाऱ्या परीक्षांबद्दल मोठी माहिती दिली आहे. २१ जून २०२६ रोजी होणाऱ्या NEET UG परीक्षेत काही महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांची सोय लक्षात परीक्षेत मोठे बदल करण्यात आले आहेत. NTA ने परीक्षेचा एकूण कालावधी वाढवून १९५ मिनिटं केला आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना पेपर पूर्ण करण्यासाठी अधिक वेळ मिळेल. याव्यतिरिक्त, प्रश्नपत्रिकेत 'रफ वर्क' करण्यासाठी अधिक जागा दिली जाईल. NTA च्या मते, विद्यार्थ्यांकडून मिळालेल्या अभिप्रायावर आधारित आणि परीक्षा प्रक्रिया सुलभ करण्याच्या उद्देशाने हे बदल लागू करण्यात आले आहेत.

NTA ने सांगितल्यानुसार, NEET UG 2026 परीक्षेचा कालावधी वाढवून १९५ मिनिटे करण्यात आला आहे. ही परीक्षा दुपारी २ ते सायंकाळी ५:१५ या वेळेत होणार आहे. या कालावधीमध्ये अटेंडेंस शीट स्वाक्षरी करणे आणि परीक्षेसंबंधी इतर आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी लागणाऱ्या वेळेचाही समावेश आहे.





**विद्यार्थ्यांना परीक्षेच्या वेळेचा अधिक चांगल्या प्रकारे वापर येईल करता**

विद्यार्थ्यांनाकडून मिळालेल्या फीडबॅकच्या आधारे महत्त्वाचे बदल करण्यात आल्याचं NTA ने स्पष्ट केलं आहे. विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी पुरेसा वेळ मिळावा आणि प्रशासकीय प्रक्रियांमुळे त्यांच्या परीक्षेच्या वेळेवर कोणताही परिणाम होऊ नये, हे सुनिश्चित करणं हा यामागचा उद्देश आहे.

**रफ कामासाठा अधिक जागा:**

NEET UG 2026 ने परीक्षाकाळात रफ कामासाठी देखील बदल केले आहे. आता विद्यार्थ्यांना रफ कामासाठी म्हणजे कच्च्या कामासाठी, कॅलकुलेशन आणि आकृत्या काढण्यासाठी पूर्वीपेक्षा अधिक जागा दिली जाईल.

**रफ वर्कसाठी नव्या पानाची व्यवस्था**

यापूर्वी, कच्च्या कामासाठी फक्त केवळ प्रश्नपत्रिकेच्या शेवटचं एक पान दिलं जात होतं. आता, रफ कामासाठी प्रश्नपत्रिकेच्या सुरुवातीलाही पाने उपलब्ध असतील. यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या सोयीनुसार काम करण्यास मदत होईल.

**NTA कडून विद्यार्थ्यांना सूचना**

NTA ने उमेदवारांना 'ॲडमिट कार्ड' (प्रवेशपत्र) आणि इंफॉर्मेशन बुलेटिनमध्ये दिलेल्या सर्व सूचना काळजीपूर्वक वाचण्याचा तसेच परीक्षा केंद्रावरील नियमांचे पालन करण्याचा सल्ला दिला आहे. संस्थेच्या म्हणण्यानुसार, परीक्षा प्रक्रिया अधिक सोयीस्कर आणि विद्यार्थ्यांसाठी अनुकूल करण्यासाठी हे महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत.

## मोहन भागवत थोडक्यात बचावले !

### प्रवास करत असलेल्या ट्रेनवर केली दगडफेक...



दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** लखनौवरुन नवी दिल्लीला जाणाऱ्या शताब्दी एक्सप्रेसच्या एका कोचवर दगडफेक झाल्याची घटना समोर आल्यानंतर रेल्वे प्रशासन आणि सुरक्षा यंत्रणांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. ही घटना गुरुवार संध्याकाळची आहे. या दगडफेकीत ज्या कोचची काच फुटली, त्या कोचमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत होते. भागवत यांना सध्या झेड सिक्युरिटी देण्यात आलेली आहे.

ही ट्रेन मक्खनपुर आणि फिरोजाबाद रेल्वे स्टेशन दरम्यान असताना, शताब्दी एक्सप्रेसवर बाहेरुन कोणीतरी दगडफेक केली. हा दगड एग्जीक्यूटिव क्लासच्या कोच ई-१ ला लागला. खिडकीची काच तुटली. ही घटना अचानक घडली. त्यामुळे ट्रेनमधील प्रवासी घाबरले. मोहन भागवत त्याच कोचमध्ये होते. पण ते खिडकीपासून लांब बसले होते. ते सुरक्षित आहेत. ट्रेन स्टाफने लगेच परिस्थितीचं गांभीर्य ओळखून सुरक्षा

(पान ३ वर...☛ )

## फिफा विश्वचषकाच्या बक्षीसांच्या रकमेत तब्बल ५० टक्क्यांची वाढ!

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**मुंबई :** क्रीडा जगतातील सर्वात मोठा आणि प्रतिष्ठेचा महाकुंभ म्हणजेच 'फिफा फुटबॉल विश्वचषक २०२६' स्पर्धेला ११ जून (भारतीय वेळेनुसार १२ जूनच्या मध्यरात्री) पासून दिमाखात सुरुवात झाली आहे.

अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको यांच्या संयुक्त यजमानपदाखाली तब्बल ३९ दिवस चालणाऱ्या या मेगा इव्हेंटमध्ये पहिल्यांदाच ४८ संघ आमनेसामने येत आहेत.

एकूण १६ मैदानांवर रंगणाऱ्या या स्पर्धेत फायनलसह तब्बल १०४ सामने खेळवले जाणार आहेत. या ऐतिहासिक स्पर्धेची सुरुवात होण्यापूर्वी 'फिफा'ने बक्षीसांच्या रकमेची (Prize Pool) अधिकृत घोषणा केली असून, यंदा पैशांचा महापूर पाहायला मिळणार आहे. गेल्या विश्वचषकाच्या तुलनेत यंदा



बक्षीसांच्या रकमेत तब्बल ५० टक्क्यांची विक्रमी वाढ करण्यात आली आहे.

**विजेत्या संघाला मिळणार ४७६ कोटी रुपये –**


फिफाने यंदा ६५५ मिलियन यूएस डॉलर्स म्हणजेच भारतीय चलनानुसार तब्बल ६,२४१ कोटी रुपयांच्या एकूण प्राइज पूलची घोषणा केली आहे. या स्पर्धेत जो संघ विश्वविजेता ठरेल आणि चमचमती ट्रॉफी उंचावेल, त्याला तब्बल

**विजेत्या-उपविजेत्याला मिळणार तब्बल 'इतके' कोटी...**

५० मिलियन डॉलर्स म्हणजेच ४७६ कोटी रुपये रोख बक्षीस मिळणार आहे. तर उपविजेत्या (Runner-up) संघाला ३३ मिलियन डॉलर्स म्हणजेच ३१४ कोटी रुपयांची घसघशीत रक्कम दिली जाईल. याशिवाय, तिसऱ्या स्थानावरील संघाला २७६ कोटी आणि चौथ्या स्थानावरील संघाला २५७ कोटी रुपये मिळतील.

**शेवटच्या ४८ व्या क्रमांकावरील संघही होणार मालामाल –**

यंदाच्या विश्वचषकाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, यात रिकाम्या हाताने कोणीच घरी परतणार नाही. स्पर्धेत पात्र ठरलेल्या सर्व ४८ संघांना फिफाकडून प्रत्येकी १० मिलियन डॉलर्स (सुमारे ८३ कोटी रुपये) क्वालिफिकेशन फी म्हणून आधीच मिळाले आहेत. त्यामुळे एकूण खर्च जोडल्यास हा आकडा ८,२९९ कोटी रुपयांवर पोहोचतो. गुणतालिकेत सर्वात तळाशी म्हणजेच ४८ व्या क्रमांकावर राहणाऱ्या संघालाही किमान ८६ कोटी रुपये घरबसल्या मिळणार आहेत. ५ ते ८ व्या क्रमांकावरील संघांना प्रत्येकी १८१ कोटी, तर ९ ते १६ व्या क्रमांकावरील संघांना प्रत्येकी १४३ कोटी रुपये दिले जातील.



### तापमान

| | | | |
|---|---|---|---|
| दिवस | : | 37⁰ | उच्च |
| रात्र | : | 26⁰ | किमान |
| सूर्योदय | : | १३ तास १४ मिनिटे | |
| उगवणे | : | 05:57 AM | |
| मावळणे | : | 07:11 PM | |
| सूर्यास्त | : | १३ तास २२ मिनिटे | |
| उगवणे | : | 02:56 AM | |
| मावळणे | : | 04:18 PM | |

### LIVE

24k सोने प्रति १० ग्रॉम
रू.१,४८,५८०/-

22k सोने प्रति १० ग्रॉम
रू. १,३६,२००/-

चांदी प्रति किलो
रू. २,६०,०००/-

डॉलर प्रति दर
रू.९६.१३



# पुरंदर विमानतळासाठी १ जुलैपासून सक्तीचे भूसंपादन

## संमतीपत्रासाठी ३० जूनपर्यंत मुदतवाढ

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**पुणे :** पुरंदर येथील प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी ३० जूनपर्यंत संमतीने भूसंपादन करण्यात येणार आहे. मात्र, १ जुलैपासून या प्रकल्पासाठी कायद्यानुसार सक्तीने भूसंपादन होणार आहे. जिल्हा प्रशासनाने संमतीपत्रासाठी दिलेली १० जूनची मुदत वाढवून मिळावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली होती. त्यानुसार ही मुदतवाढ दिल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली. विमानतळासाठी आतापर्यंत आवश्यक असलेल्या ७० टक्के अर्थात ८५१ हेक्टरचे संपादन झाले असून, ९५० कोटी रुपयांचा मोबदला शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाला आहे. याबाबत डुडी म्हणाले, 'विमानतळासाठी आवश्यक असलेल्या १ हजार



२१६ हेक्टर क्षेत्रापैकी ८५१ हेक्टर जमिनीचे संपादन पूर्ण झाले असून सुमारे ७० टक्के करारनामे केले आहेत. या भूसंपादनापोटी आतापर्यंत ९५० कोटी रुपयांच्या मोबदल्याचे वाटप झाले आहे. एकूण भूसंपादनासाठी सुमारे ६ हजार कोटी रुपयांची आवश्यकता असून हा निधी टप्प्याटप्प्याने प्राप्त होत आहे. शेतकऱ्यांचा प्रतिसाद वाढला असून करारनाम्यांचे प्रमाणही वाढले आहे. करारनामे होताच शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा केले जात असल्याने जिल्हा प्रशासनाला पैशांची गरज भासत आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी एमआयडीसीकडे २ हजार कोटी रुपयांची मागणी केली आहे. पुढील आठवड्यात मंगळवारपर्यंत हे पैसे जिल्हा प्रशासनाला प्राप्त होतील, अशी माहिती डुडी यांनी दिली. भूसंपादनासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी १० जूनची मुदत दिली होती. याकाळात संमतीपत्रे स्वीकारण्यात येणार होती. मात्र, काही शेतकऱ्यांच्या जमिनींचे मूल्यांकन, न्यायालयीन दावे, महसूल विभागातील प्रकरणे, नाव दुरुस्ती, वारस नोंदी, हक्कसोडपत्र आणि इतर महसुली प्रक्रिया प्रलंबित आहेत. या अडचणी दूर करण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू असले तरी त्यास काहीसा कालावधी लागत आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी आणि ग्रामपंचायत प्रतिनिधींनी मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. संबंधित सर्व बाबींचा विचार करून भूसंपादनाच्या संमती व मोबदला स्वीकारण्यासाठी ३० जूनपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे, असे डुडी यांनी स्पष्ट केले.

या मुदतवाढीमुळे प्रलंबित कागदपत्रे आणि महसुली प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांना अतिरिक्त वेळ मिळणार असून उर्वरित जमीन संपादनाची प्रक्रिया अधिक सुलभ होण्यास मदत होईल, असा विश्वास जिल्हा प्रशासनाने व्यक्त केला आहे. दरम्यान, संमतीपत्रांसाठी ही शेवटची मुदत असणार आहे. त्यानंतर अर्थात १ जुलैपासून महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाच्या कायद्यानुसार सक्तीचे भूसंपादन करण्यात येणार आहे. त्यामुळे अशा शेतकऱ्यांना १० टक्के परतावा मिळणार नाही. तसेच एमआयडीसीकडून देण्यात येणाऱ्या नोकरीचाही लाभ मिळणार नाही असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे या २० दिवसांच्या काळात सर्व शेतकऱ्यांच्या संमतीपत्रांसाठी जिल्हा प्रशासनाने कंबर कसली आहे.

# पुणे स्थानकावर रविवारी 'मेगाब्लॉक'

## पुणे-दौंड लोहमार्गावरील कामासाठी रेल्वे प्रशासनाचा निर्णय

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**पुणे :** पुणे-दौंड लोहमार्गावरील पायाभूत सुविधांच्या महत्त्वपूर्ण कामासाठी रेल्वे प्रशासनाने पुणे स्थानकाच्या यार्डमध्ये रविवारी (ता. १४) विशेष वाहतूक ब्लॉक घेतला आहे. सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत चालणाऱ्या या ९ तासांच्या ब्लॉकमुळे पुणे स्थानकावरून सुटणाऱ्या आणि दाखल होणाऱ्या गाड्यांचे वेळापत्रक विस्कळित होणार असून अनेक गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. पुणे स्थानकावरील फलाट क्रमांक ३ आणि ४ मुंबईकडून येणाऱ्या गाड्यांच्या वाहतुकीसाठी उपलब्ध नसतील.

गाडी क्र. ९९९०२ पुणे – तळेगाव लोकल

गाडी क्र. ९९९०३ तळेगाव – पुणे लोकल



गाडी क्र. १२१३५ पुणे – नागपूर एक्स्प्रेस

गाडी क्र. १२१३६ नागपूर – पुणे एक्स्प्रेस

गाडी क्र. ७१४०६ बारामती – पुणे डेमू

गाडी क्र. ७१४०७ पुणे – दौंड डेमू

गाडी क्र. ७१४२० सातारा – पुणे डेमू

गाडी क्र. ११००७ मुंबई – पुणे डेक्कन एक्स्प्रेस

गाडी क्र. ११००८ पुणे – मुंबई डेक्कन एक्स्प्रेस

**या गाड्या अंशतः रद्द**

(शिवाजीनगर स्थानकावरच प्रवास संपेल, पुण्याला येणार नाही)

गाडी क्र. ९९८०५ लोणावळा – पुणे लोकल

गाडी क्र. ९९८०७ लोणावळा– पुणे लोकल

गाडी क्र. ९९९०७ तळेगाव – पुणे लोकल

गाडी क्र. १२९४० जयपूर – पुणे एक्स्प्रेस. खडकी स्थानकात थांबेल.

गाडी क्र. १२१२७ सीएसएमटी मुंबई – पुणे एक्स्प्रेस. खडकी स्थानकात थांबेल.

गाडी क्र. ११०७८ जम्मू तावी – पुणे एक्स्प्रेस. हडपसर स्थानकात थांबेल.

गाडी क्र. ११४०६ अमरा

# पंतप्रधानांच्या १२ वर्षांच्या कार्यपूर्ती पत्रकार परिषदेत पालकमंत्री व खासदारांची बोलती बंद

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**पालघर - प्रतिनिधी**

**रवि राठोड**

**पालघर :** पंतप्रधानांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या १२ वर्षांच्या कार्यपूर्ती निमित्त आयोजित पत्रकार परिषदेत पालघरचे पालकमंत्री गणेश नाईक आणि खासदार हेमंत सावरा यांची पत्रकारांच्या प्रश्नांनी अक्षरशः कोंडी केल्याचे पाहायला मिळाले. स्थानिक विकास, रखडलेले प्रकल्प, रोजगार, रस्त्यांची दुरवस्था आणि नागरिकांच्या मूलभूत समस्यांवर विचारण्यात आलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देण्यात दोन्ही लोकप्रतिनिधी अपयशी ठरल्याने पत्रकार परिषदेत त्यांची चांगलीच गोची झाली.

केंद्र सरकारच्या योजनांची आणि उपलब्धींची लांबलचक यादी मांडण्यात वेळ घालवण्यात आला; मात्र पालघर जिल्ह्याच्या वास्तवाशी संबंधित प्रश्न उपस्थित होताच पालकमंत्री आणि खासदार यांच्याकडे ठोस उत्तरांचा दुष्काळ असल्याचे स्पष्ट झाले. अनेक प्रश्नांना गोलमोल उत्तरे देत विषयांतर करण्याचा प्रयत्न




करण्यात आला, तर काही प्रश्नांवर थेट उत्तर देणेही टाळण्यात आले.

पत्रकारांनी प्रलंबित विकासकामांची सद्यस्थिती, निधीचा वापर, रोजगारनिर्मितीची आकडेवारी आणि रखडलेल्या प्रकल्पांच्या कालमर्यादेबाबत प्रश्न उपस्थित केले. मात्र, याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती अथवा ठोस आश्वासने न मिळाल्याने उपस्थित पत्रकारांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. जिल्ह्याच्या प्रश्नांबाबत अभ्यासाअभावी आणि तयारीशिवाय पत्रकार परिषदेला हजेरी लावल्याचा आरोपही यावेळी उपस्थितांकडून करण्यात आला.

विशेष म्हणजे, विकासाच्या दाव्यांचा गजर करणाऱ्या सत्ताधारी नेत्यांना पालघरच्या जनतेसमोरील मूलभूत प्रश्नांची उत्तरे देता आली नाहीत. त्यामुळे '१२ वर्षांच्या कामगिरीचा गवगवा आणि स्थानिक प्रश्नांवर मौन' अशी चर्चा पत्रकार परिषदेनंतर रंगली.

जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींनी केवळ योजनांची जाहिरात न करता प्रत्यक्षात जिल्ह्याच्या प्रश्नांवर उत्तरदायित्व स्वीकारावे, अशी भावना यानिमित्ताने नागरिकांनी व्यक्त केली. पत्रकार परिषद संपल्यानंतरही पालकमंत्री आणि खासदार यांच्या निरुत्तर भूमिकेची चर्चा राजकीय वर्तुळात रंगत होती.

# शेतकऱ्यांचा मित्र मृग किडा नामशेष होण्याच्या मार्गावर रासायनिक शेतीमुळे अस्तित्व धोक्यात

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**वाशिम/रिसोड - प्रतिनिधी**

**भागवत घुगे**

**रिसोड :** मृग नक्षत्राच्या आगमनासोबतच ग्रामीण भागात दिसणारा लाल रंगाचा मखमली मृग किडा अर्थात इंद्रगोप हा शेतकऱ्यांचा नैसर्गिक मित्र मानला जातो. मात्र रासायनिक खतांचा, कीटकनाशकांचा आणि तणनाशकांचा वाढता व अतिरेकी वापर यामुळे हा उपयुक्त किडा आता नामशेष होण्याच्या मार्गावर असून, मृग नक्षत्राला सुरुवात होऊनही मृग किडा दिसेनासा झाला आहे. मृग नक्षत्राच्या काळात, साधारण जून महिन्यात पहिल्या पावसानंतर जमिनीतून बाहेर येणारा हा लाल मखमली किडा ग्रामीण भागात मृग किडा, इंद्रगोपकिंवा लाल मखमली किडा म्हणून ओळखला जातो. पूर्वी पावसाळ्याच्या सुरुवातीला मोठ्या प्रमाणात दिसणारा हा किडा आता दुर्मिळ होत चालला आहे.

मृग किडा वर्षभर उघड्यावर दिसत नाही. तो बहुतेक काळ जमिनीखाली खोलवर किंवा पालापाचोळ्याच्या थरामध्ये सुप्त अवस्थेत राहतो.

**मऊ, ओलसर आणि वाळूमिश्रित**

पिवळसर मातीमध्ये तो स्वतःचे बीळ तयार करून वास्तव्य करतो.



**कीटकनाशक, तणनाशकांचा वापर वाढला**

पावसाळ्याच्या सुरुवातीला पहिली दमदार सर बरसल्यावरच हे किडे जमिनीवर येतात. नर-मादी मिलन आणि अन्नाच्या शोधासाठी ते सकाळी व संध्याकाळी फिरताना दिसतात. कडक उन्हात मात्र ते बाहेर पडत नाहीत. वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहता मृग किडा पिकांचे कोणतेही नुकसान करत नाही. उलट तो शेतीसाठी अत्यंत उपयुक्त ठरतो. हा किडा पिकांना हानी पोहोचवणाऱ्या विविध कीटकांची अंडी, अळ्या आणि लहान कीटकांवर उपजीविका करतो. मावा, तुडतुडे, कोळी तसेच इतर उपद्रवी किड्यांची संख्या नियंत्रणात ठेवण्याचे महत्त्वाचे काम तो करतो. याच्या अळ्या टोळ आणि नाकतोड्यासारख्या

पिकांची नासाडी करणाऱ्या कीटकांवरही उपजीविका करतात. त्यामुळे नैसर्गिक पद्धतीने कीड नियंत्रण होऊन शेतकऱ्यांचा रासायनिक औषधांवरील खर्च कमी होण्यास मदत होते. मृग किडा जमिनीतील सूक्ष्म परिसंस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. तो अशा सूक्ष्म जीवांवर नियंत्रण ठेवतो जे उपयुक्त बुरशी आणि जीवाणूंना हानी पोहोचवतात. त्यामुळे पालापाचोळ्याचे विघटन वेगाने होऊन जमिनीत सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढते आणि जमीन अधिक सुपीक बनते. यामुळे त्याला शेतकऱ्यांचा मित्र मानले जाते. पूर्वी पाऊस पडल्यावर मृग किडा जमिनी बाहेर निघाल्यास शेतकऱ्यांच्या महिला त्याची हळदी कुंकू ने पूजा करत होत्या आता मात्र मृग किडा सह आता पूजा करण्याची प्रथा ही काळानुसार लोप पावत चालली आहे.

**नैसर्गिक अधिवास नष्ट**

शेतीमध्ये वाढत्या प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या रासायनिक खतांमुळे, कीटकनाशकांमुळे आणि तणनाशकांमुळे मृग किड्यांचे नैसर्गिक अधिवास नष्ट होत आहेत. जमिनीतील जैवविविधतेवर याचा विपरीत परिणाम होत असून या उपयुक्त किड्यांची संख्या झपाट्याने घटत आहे. सेंद्रिय शेती आणि पर्यावरणपूरक कृषी पद्धतींचा अवलंब केल्यास या नैसर्गिक मित्राचे संवर्धन होऊ शकते. पर्यावरण संतुलन राखण्यासाठी आणि शेतीचे आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी मृग किड्यासारख्या उपयुक्त जीवांचे संरक्षण करणे काळाची गरज बनली आहे. शेतकऱ्यांनी रासायनिक घटकांचा वापर कमी करून सेंद्रिय आणि नैसर्गिक शेतीकडे वळल्यास या दुर्मीळ होत चाललेल्या किड्याचे अस्तित्व जपणे शक्य होणार असल्याचे मत कृषितज्ज्ञ व पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केले आहे.

# ५० हजार दे तर वाचशील..!

## गांजा तस्करीच्या नावाखाली लूटमार करणाऱ्यांना पोलिसांकडून अटक



**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**पुणे :** 'तू गांजा विकण्यासाठी इथे आला आहेस. पोलिसांना फोन करून अशी माहिती देतो. तुला वाचायचे असेल तर ५० हजार रुपये दे', असे म्हणत तरुणाला लुटणाऱ्या दोघांना पर्वती पोलिसांनी अटक केली.

प्रमोद अंकुश कळंबे (वय २०, रा. पर्वती दर्शन) आणि बसवराज ऊर्फ अभिषेक राजेंद्र पाटील (वय २०, रा. जनता वसाहत, सध्या कात्रज खोपडे) नगर अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

पर्वती पायथा परिसरात टोळक्याने एका तरुणाला ६ जून रोजी अडवून चाकूचा धाक दाखवला. गांजा तस्कर असल्याचा आरोप करत ५० हजारांची मागणी टोळक्याने केली. त्याच्याकडून ३ हजारांची रोकड, सोन्याची बाळी आणि २१ हजार रुपये गुगल पेद्वारे ऑनलाइन घेतले. याप्रकरणी गुन्हा दाखल होताच पर्वती पोलिसांनी तपासाला गती दिली. तपास अधिकारी किरण पवार यांना तपासादरम्यान आरोपींची माहिती मिळाली. पथकाने प्रमोद कळंबे आणि बसवराज पाटील यांना ताब्यात घेत, त्यांच्याकडून गुन्ह्यातील ऐवज जप्त केला. ही कामगिरी उपायुक्त मिलिंद मोहिते, एसीपी धन्यकुमार गोडसे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र सहाणे, उपनिरीक्षक किरण पवार, प्रकाश मरगजे, महेश मंडलिक, राकेश सुर्वे, स्वप्निल घुगे, नानासो खाडे, मनोज बनसोड, सद्दाम शेख आणि सूर्या जाधव यांनी केली.

# बसथांबा आहे तिथे बस नाही

## शिऊर बंगला येथे एसटीच्या मनमानीने प्रवासी हैराण!

**'विद्यार्थी आणि वृद्धांची फरफट; शिऊर बंगला बसथांब्यावर एसटी प्रशासनाचे दुर्लक्ष?'**

**'बसथांबा एकीकडे आणि बस दुसरीकडे; शिऊर बंगला येथे प्रवाशांची रोजची धावपळ, प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी!'**

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**वैजापूर - प्रतिनिधी**

**अरविंद पवार**

**वैजापूर :** वैजापूर आगारातून धावणारी वैजापूर-कन्नड बस शिऊर बंगला येथील अधिकृत बसथांब्यावर न थांबता तब्बल १०० ते २०० मीटर मागेच थांबत असल्याने परिसरातील विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. दररोजच्या या प्रकारामुळे प्रवाशांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत असून संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने याकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे. शिऊर बंगला येथे अधिकृत बसथांबा असतानाही काही चालकांकडून बस थांब्यापासून मागेच उभी केली जात असल्याने शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना धावत जाऊन बस पकडावी लागत आहे. अनेक वेळा



**आगरप्रमुख किरण धनवटे**

'प्रवाशांच्या तक्रारीची दखल घेऊन सर्व बस चालकांना अधिकृत बसथांब्यावरच बस थांबविण्याच्या स्पष्ट सूचना देतो. प्रवाशांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही.'

वयोवृद्ध नागरिकांना व महिलांना उन्हात, पावसात अथवा वाहतुकीच्या धोक्यातून चालत जावे लागत असल्याने त्यांची मोठी गैरसोय होत आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, बसथांब्यावर उभे असलेले प्रवासी बसची वाट पाहत असताना अचानक बस मागे थांबत असल्यामुळे लहान मुलांना आणि वृद्धांना धावपळ करावी लागते. त्यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला असून एखादी दुर्दैवी घटना घडल्यास याला जबाबदार कोण, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

नियमांनुसार बसने अधिकृत बसथांब्यावरच थांबणे अपेक्षित असताना त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी असलेल्या बससेवेचा असा मनमानी कारभार सर्वसामान्यांच्या जिव्हारी लागला असून संबंधित चालक व वाहकांना योग्य सूचना देऊन शिऊर बंगला बसथांब्यावरच बस थांबविण्याचे आदेश देण्यात यावेत, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

'प्रवाशांच्या सुरक्षिततेशी खेळ नको; शिऊर बंगला बसथांब्यावरच बस थांबवा.

# पुणे-नागपूर वंदे भारत एक्स्प्रेसची क्षमता दुप्पट होणार

## ८ ऐवजी १६ डब्यांचा प्रस्ताव, वेटिंग लिस्टचा ताण कमी होणार

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**पुणे :** पुणे-नागपूर (अजनी) वंदे भारत एक्स्प्रेसला मिळणारा वाढता प्रतिसाद पाहून या गाडीची क्षमता दुप्पट करण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला आहे. सध्याच्या आठ डब्यांमध्ये आणखी आठ डबे वाढवून, ती १६ डब्यांची करण्याचा प्रस्ताव पुणे विभागाने मुख्यालय व रेल्वे बोर्डाकडे पाठविला आहे.

पुणे ते नागपूर दरम्यान १० ऑगस्ट २०२५ रोजी सुरू झालेल्या या गाडीला प्रवाशांचा १०० टक्क्यांहून अधिक प्रतिसाद मिळत आहे. विशेषतः उन्हाळी सुट्ट्या आणि सणासुदीच्या काळात वेटिंग लिस्ट मोठी असल्याने प्रवाशांची गैरसोय होत होती. ही अडचण दूर करण्यासाठी पुणे रेल्वे विभागाने डबे वाढविण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. या प्रस्तावाला लवकरच मंजुरी मिळण्याची शक्यता असून, त्यानंतर प्रवाशांना दुप्पट जागा उपलब्ध होतील.

**प्रवाशांना होणारे फायदे**

एकाच वेळी दुप्पट प्रवाशांना प्रवासाची संधी मिळेल.

सणासुदीच्या काळात वेटिंग लिस्ट कमी होऊन कन्फर्म तिकीट मिळणे सुलभ होईल.

अचानक प्रवास करणाऱ्या व्यावसायिक आणि वैद्यकीय गरजा असलेल्या प्रवाशांना दिलासा मिळेल.



पुणे-अजनी वंदे भारत एक्स्प्रेसला प्रवाशांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. प्रवाशांची सोय लक्षात घेऊन आम्ही आठ डबे वाढविण्याचा प्रस्ताव मुख्यालयाला पाठविला आहे. मंजुरी मिळताच याची अंमलबजावणी केली जाईल.

**- शीलभद्र गौतम,**
**प्रभारी जनसंपर्क अधिकारी,**
**रेल्वे विभाग, पुणे**

पुण्याहून शेगाव आणि जळगावला जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी असल्याने या गाडीला नेहमी वेटिंग असते. डबे वाढवण्याचा निर्णय प्रवाशांसाठी अत्यंत गरजेचा आणि स्वागतार्ह आहे.

**- पीयूष संगापूरकर,**
**रेल्वे अभ्यासक, पुणे**

# वाशिम ते पंढरपूर बस सेवा दररोज सुरू व्हावी यासाठी शिवशंकर भोयर यांची निवेदनाद्वारे परिवहनमंत्र्याकडे मागणी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
वाशिम - प्रतिनिधी
प्रताप नागरे

**वाशिम :** वाशिम जिल्ह्यातील वारकरी भाविकांना पंढरपूर येथे जाण्यासाठी थेट बससेवा उपलब्ध नसल्याने अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर श्री संत ज्ञानेश्वर माऊली वारकरी शिक्षण संस्था, वांगीचे संस्थापक अध्यक्ष शिवशंकर भोयर यांनी राज्याचे परिवहन मंत्री नामदार प्रतापजी सरनाईक यांची भेट घेऊन वाशिम ते पंढरपूर दररोज बससेवा सुरू करण्याबाबत निवेदन सादर केले. यावेळी शिवशंकर भोयर यांनी वारकरी संप्रदायातील हजारो भाविकांच्या सोयीसाठी पंढरपूरपर्यंत थेट बससेवा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. निवेदनाची दखल घेत परिवहन मंत्री प्रतापजी सरनाईक यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून वाशिम-पंढरपूर बससेवा सुरू करण्याबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल, तसेच आवश्यक कार्यवाही करून ही सेवा लवकरात लवकर सुरू करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन दिले. या प्रसंगी प्रसिद्ध उद्योगपती व समाजसेवक गिरधारीलाल सारडा हेही उपस्थित होते. त्यांनी भाविकांच्या सोयीसाठी ही बससेवा अत्यंत उपयुक्त व आवश्यक



असल्याचे मत व्यक्त केले. वाशिम जिल्ह्यातील वारकरी, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्वसामान्य प्रवाशांच्या प्रवाससुविधा लक्षात घेता वाशिम-पंढरपूर बससेवा तातडीने सुरू करण्यात यावी, अशी मागणी शिवशंकर भोयर यांनी परिवहन मंत्र्यांकडे केली. मंत्री महोदयांनी दिलेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे भाविकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून ही बससेवा लवकरच सुरू होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# वाहतूक नियमभंग करणाऱ्यांवर नातेपुते पोलिसांचा धडक कारवाईचा बडगा;

## ७८ केसेसमध्ये ५४,४०० रुपयांचा दंड

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
माळशिरस - प्रतिनिधी
राजेंद्र पिसे

**नातेपुते :** नातेपुते शहर व परिसरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी तसेच वाढत्या रस्ते अपघातांना आळा घालण्यासाठी नातेपुते पोलिसांनी वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध विशेष मोहीम राबवली. या धडक कारवाईत विविध वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ७८ वाहनचालकांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यांच्याकडून एकूण ५४ हजार ४०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. नातेपुते पोलीस ठाण्याच्या हद्दीत काही वाहनचालकांकडून वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे निदर्शनास आल्यानंतर पोलिसांनी ही मोहीम हाती घेतली. या मोहिमेत नो पार्किंग, ड्रिंक अँड ड्राईव्ह, ट्रिपल सीट,



फॅन्सी नंबर प्लेट तसेच वाहन चालविताना मोबाईलवर बोलणे अशा विविध नियमभंगांवर कारवाई करण्यात आली. बाजारपेठ व मुख्य रस्त्यांवर वाहतुकीस अडथळा ठरणारी वाहने उभी करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवून

> ''नातेपुते शहर व परिसरातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. विशेषतः रस्त्यावर विरोधी दिशेने (Wrong Side) वाहन चालवू नये. काही मिनिटांचा वेळ वाचविण्याच्या प्रयत्नात अनेकदा गंभीर अपघात घडतात आणि निष्पाप नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण होतो. वाहन चालविताना हेल्मेट व सीटबेल्टचा वापर करावा, मोबाईलवर बोलणे टाळावे तसेच मद्यपान करून वाहन चालवू नये. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल. सुरक्षित वाहतुकीसाठी नागरिकांनी पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे.'
>
> - API विशाल वायकर
> नातेपुते पोलीस ठाणे

स्वतःसह इतरांच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्या वाहनचालकांनाही पोलिसांनी चांगलाच दणका दिला. दुचाकीवर तिघेजण प्रवास करणारे, नियमबाह्य फॅन्सी नंबर प्लेट वापरणारे तसेच वाहन चालविताना मोबाईलवर बोलणारे चालकही पोलिसांच्या कारवाईतून सुटले नाहीत.

'ही मोहीम दंड वसूल करण्यासाठी नसून वाहनचालकांमध्ये वाहतूक शिस्त निर्माण करण्यासाठी आणि अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी राबविण्यात येत आहे. नागरिकांनी हेल्मेट व सीटबेल्टचा वापर करून वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे. यापुढेही अशी कारवाई अधिक तीव्रतेने सुरूराहणार आहे,' असे आवाहन नातेपुते पोलिसांनी केले आहे.

या कारवाईमुळे वाहतूक नियम मोडणाऱ्यांमध्ये चांगलीच खळबळ उडाली असून नियमांचे पालन करणाऱ्या नागरिकांकडून पोलिसांच्या या उपक्रमाचे स्वागत केले जात आहे.

# पत्रकार प्रकाश इंगळे आणि पोलिसांच्या तत्परतेमुळे छत्रपती संभाजीनगरमधील मोठा अनर्थ टळला

## दहशत माजवणारा आणि शिवीगाळ करणारा गुंड शिवसेना कार्यालयावर हल्ला करण्याचा प्रयत्न

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
छत्रपती संभाजीनगर
प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील क्रांती चौक पोलीस ठाण्याच्या हद्दीत आज सकाळी एक दहशत माजवणारा आणि शिवीगाळ करणारा गुंड हातात दांडा घेऊन रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांना धमकावत प्रचंड दहशत निर्माण केली. या माथेफिरूने येथील एका नाश्ता सेंटरसह विधान परिषदेचे आमदार अंबादास दानवे यांचे जनसंपर्क कार्यालय आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या कार्यालयावर दांडा फेकून मारत हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र, घटनास्थळी हजर असलेले 'दैनिक चालु वार्ता'चे प्रतिनिधी प्रकाश इंगळे यांच्या समयसूचकतेमुळे आणि पोलिसांनी घेतलेल्या तात्काळ ॲक्शनमुळे पुढील मोठा वाद टळला आहे.

**भररस्त्यात वाहने अडवून जातीवाचक शिवीगाळ**

मिळालेल्या माहितीनुसार, आज सकाळच्या सुमारास एक अज्ञात युवक हातात मोठा दांडा घेऊन रस्त्यावर उतरला. त्याने भररस्त्यात आपली गाडी आडवी लावून येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांना अडवण्यास सुरुवात केली. एवढ्यावरूनच न थांबता या युवकाने तेथे असलेल्या नाश्ता सेंटरवर नाश्ता करणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि इतर नागरिकांना अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन जातीवाचक शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. यामुळे परिसरात अचानक भीतीचे वातावरण निर्माण झाले.

**शिवसेना कार्यालयाला बनवले लक्ष्य**

हा माथेफिरू एवढ्यावरच थांबला नाही, तर त्याने समोरच असलेले शिवसेना नेते व आमदार अंबादास दानवे यांचे कार्यालय आणि शिवसेना कार्यालयाच्या दिशेने हातात असलेला दांडा जोरात फेकून मारला. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे तेथे उपस्थित नागरिक आणि पक्षाचे कार्यकर्ते गोंधळात पडले. राजकीय कार्यालयावर हल्ला आणि त्यातच सुरू असलेली जातीवाचक शिवीगाळ यामुळे या घटनेला गंभीर स्वरूप येऊन शहरात मोठा वाद उसळण्याची दाट शक्यता निर्माण झाली होती.

**पत्रकार प्रकाश इंगळे यांची सतर्कता आली कामी**

ही संपूर्ण घटना घडत असताना 'दैनिक चालु वार्ता'चे छत्रपती संभाजीनगरचे प्रतिनिधी प्रकाश इंगळे हे घटनास्थळी उपस्थित होते. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून आणि यामुळे शहरात मोठी कायदा व सुव्यवस्थेची समस्या निर्माण होऊ शकते हे लक्षात घेऊन त्यांनी कोणताही वेळ वाया न घालवता थेट क्रांती चौक पोलीस ठाण्याशी संपर्क साधला आणि तात्काळ मदतीची मागणी केली.

**पोलिसांची तातडीने धाव, गुंड पसार**

पत्रकार इंगळे यांच्या फोननंतर क्रांती चौक पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी अत्यंत तत्परतेने अवघ्या काही मिनिटांतच घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांची गाडी येताना पाहताच परिसरात दहशत माजवणारा आणि शिवीगाळ करणारा तो गुंड आपला दांडा टाकून घटनास्थळावरून पळून गेला. थोडक्यात सुटका, नागरिकांकडून कौतुक:

जर पोलिसांनी येण्यास थोडा जरी उशीर केला असता किंवा पत्रकार प्रकाश इंगळे यांनी तात्काळ पाऊल उचलले नसते, तर या घटनेला हिंसक वळण लागले असते. आमदार अंबादास दानवे यांच्या कार्यालयावर झालेल्या या प्रकारामुळे राजकीय वातावरणही तापू शकले असते. मात्र, लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाची (पत्रकारिता) सतर्कता आणि खाकी वर्दीची तत्परता यामुळे आज छत्रपती संभाजीनगरमधील एक मोठा अनर्थ टळला आहे. या कामगिरीबद्दल पत्रकार प्रकाश इंगळे आणि क्रांती चौक पोलिसांचे नागरिकांकडून कौतुक होत आहे. पोलीस सध्या या पळून गेलेल्या माथेफिरूचा शोध घेत आहेत.

# चामोर्शी अत्याचार प्रकरण आरोपींना कठोर शिक्षा द्या

## माजी आमदार डॉ.देवराव होळी यांचे पोलीस अधीक्षकांना निवेदन

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
गडचिरोली - प्रतिनिधी
विजय शेडमाके

**गडचिरोली :** (चामोर्शी) येथील अल्पवयीन मुलीवर झालेल्या अमानुष अत्याचाराच्या घटनेतील आरोपींविरुद्ध जलदगती न्यायालयात खटला चालवून कठोरात कठोर शिक्षा करण्यात यावी, या मागणीसाठी माजी आमदार तथा भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा प्रदेशाध्यक्ष डॉ. देवराव होळी यांनी गडचिरोलीचे पोलीस अधीक्षक एम. रमेश यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. यावेळी महिलांवरील वाढत्या अत्याचाराच्या घटनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. अशा घटना रोखण्यासाठी प्रभावी



उपाययोजना राबविणे, महिलांच्या सुरक्षिततेसाठी ठोस पावले उचलणे आणि गुन्हेगारांवर कठोर कारवाई करणे, अशी मागणीही करण्यात आली. यावर पोलीस अधीक्षक एम. रमेश यांनी सदर प्रकरणात आरोपीविरुद्ध गुन्हा क्र.२८०/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ मधील कलम ६४(१), ६५(२) तसेच लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम (पॉक्सो) २०१२ च्या कलम ४ व ६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती दिली. तसेच पीडित कुटुंबाला संपूर्ण संरक्षण देण्यात आले असून आरोपीला कठोर शिक्षा व्हावी यासाठी पोलीस विभागामार्फत सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली. या निवेदनावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष प्रा.रमेश बारसागडे, दिलीप चलाख तसेच पक्षाचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. महिलांवरील अत्याचाराच्या घटनांबाबत समाजात तीव्र संताप व्यक्त होत असून दोषींना कठोर शिक्षा करून अशा प्रवृत्तींना आळा घालण्याची मागणी नागरिकांकडूनही होत आहे.

# पावसाळ्यापूर्वी वीज समस्या सोडवा

## महावितरणला आमदार जितेश अंतापूरकर यांचे निर्देश

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
बिलोली - प्रतिनिधी
गणेश कदम

**बिलोली :** देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघातील विविध गावांमध्ये उद्भवणाऱ्या वीज समस्यांवर तोडगा काढण्यासाठी आमदार जितेश अंतापूरकर यांनी देगलूर येथे महत्त्वपूर्ण आढावा बैठक घेतली. या बैठकीत महावितरणच्या अधिकाऱ्यांना नागरिकांच्या तक्रारी गांभीर्याने घेऊन प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

बैठकीत वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, कमी दाबामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी, रखडलेली दुरुस्ती कामे, नवीन विद्युत सुविधा तसेच इतर तांत्रिक समस्यांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. विविध गावांतील नागरिक आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांनी आपल्या समस्या मांडल्यानंतर आमदार अंतापूरकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेऊन आवश्यक त्या उपाययोजना त्वरित राबविण्याचे निर्देश दिले.



पावसाळा जवळ आल्याने विद्युत यंत्रणेची देखभाल, धोकादायक वीजवाहिन्यांची दुरुस्ती, ट्रान्सफॉर्मरची नियमित तपासणी तसेच झाडांच्या फांद्यांमुळे वीजपुरवठ्यात येणारे अडथळे दूर करण्यावर विशेष भर देण्यात आला. ग्रामीण भागातील नागरिकांना अखंडित आणि सुरक्षित वीजपुरवठा मिळावा यासाठी नियोजनबद्ध कृती आराखडा तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आदेशही यावेळी देण्यात आले.

यावेळी आमदार अंतापूरकर यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्नांमध्ये कोणतीही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. वीज समस्यांच्या निराकरणात अनावश्यक विलंब झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

देगलूर-बिलोली मतदारसंघातील वीज व्यवस्था अधिक सक्षम व कार्यक्षम करण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील असल्याचे आमदार अंतापूरकर यांनी नमूद केले. नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी लोकप्रतिनिधी व प्रशासन यांनी समन्वयाने काम करणे आवश्यक असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. बैठकीला महावितरणचे अधिकारी, कर्मचारी, स्थानिक पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नांदेड जिल्ह्यातील १४ सरपंचांचा गौरव

## शिराढोण गाव ठरले आदर्श

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
शिराढोण - प्रतिनिधी
गजानन देवणे

**शिराढोण :** गावाच्या विकासात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या नांदेड जिल्ह्यातील १४ सरपंचांना लोकमत ग्रुपतर्फे 'जिल्हास्तरीय लोकमत सरपंच पुरस्कार २०२६' देऊन गौरविण्यात आले. बीकेटी टायर्स प्रस्तुत, संतूर, टाटा पॉवर सोलरूफ, आयटेल, एम पी बिरला सिमेंट आणि दीपक फर्टिलायझर्सच्या सहकार्याने झालेल्या या पाचव्या पर्वाचा पुरस्कार वितरण समारंभ गुरुवारी ए.के. संभाजी मंगल कार्यालय, पावडेवाडी नाका, नांदेड येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

कंधार तालुक्यातील मौजे शिराढोण ग्रामपंचायतीचे सरपंच प्रा.खुशालराव माधवराव पांडागळे यांना 'पर्यावरण संवर्धन' या कॅटेगिरीतील जिल्हास्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. गावात राबवलेली वृक्षलागवड मोहीम, जलसंवर्धन प्रकल्प आणि प्लास्टिकमुक्त शिराढोण या उपक्रमांमुळे त्यांच्या कार्याची विशेष



माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते शिराढोणचे सरपंच प्रा. खुशालराव माधवराव पांडागळे यांना 'पर्यावरण संवर्धन' कॅटेगिरीतील जिल्हास्तरीय लोकमत सरपंच पुरस्कार प्रदान करताना सोबत इतर मान्यवर उपस्थित होते.

**शिराढोणचे सरपंच प्रा.खुशालराव पांडागळे यांना जिल्हास्तरीय 'लोकमत सरपंच पुरस्कार'**

**पर्यावरण संवर्धनातील कार्याची दखल; माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते सन्मान**

दखल घेण्यात आली.

पुरस्कार वितरण माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते झाले. यावेळी लोकमत छत्रपती संभाजीनगर आवृत्तीचे संपादक नंदकिशोर पाटील, काँग्रेस जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, जि.प.चे सेवानिवृत्त अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजी कपाळे, पशुसंवर्धन सहायक आयुक्त डॉ. प्रविणकुमार घुले, लोकमतचे वृत्तसंपादक राजेश निस्ताने, उपमहाव्यवस्थापक रमेश तावडे, जिल्हा प्रतिनिधी श्रीनिवास भोसले यांच्यासह बीकेटी टायर्सचे शेख जुबेर, कपील जाजू, टाटा पॉवर सोलरूफचे मकरंद कुलकर्णी, एमपी बिरला सिमेंटचे अमित रंजन झा, महाधनचे जयेश पाटील उपस्थित होते.

**अशोकराव चव्हाण म्हणाले...**

'राजकारणाच्या मुख्य प्रवाहात 'सरपंच' हे पद केवळ एक प्रशासकीय घटक नसून ते लोकशाहीच्या तळागाळातील परिवर्तनाचे मुख्य केंद्र आहे. गावाची ओळख देशपातळीवर नेणारा मुख्य घटकच सरपंच असतो.'

(पान १ वरून...)

## ४० लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीचा विनाअट लाभ पण...

कर्जमाफी आहे. आमच्या डोळ्यासमोर राजकीय हेतू नाही, आपल्या शेतकऱ्याला कसं सक्षम करता येईल. अन्यथा २०२९ ची निवडणूक असल्यानं डिसेंबर २०२८ ला कर्जमाफी करता आली असती, ते आम्ही केलेलं नाही, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

आज राज्यात अनेक शेतकरी असे आहेत आपला माल निर्यात करत आहेत. अनेक शेतकरी असे आहेत जे शेतीत परिवर्तन करत मॉडेल शेती तयार करत आहेत. शेतीला फायद्यात आणत आहेत. मात्र गरीब शेतकऱ्यांना मदत करावी लागेल आणि सक्षम करावं लागेल. सरकार ते करेल, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. याशिवाय वित्त विभागासंदर्भात बोलायचं तर आता तरी अर्थ विभाग माझ्याकडेच आहे, असं देखील देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

**शेतकऱ्यांनी सरकारच्या सूचनांचा वापर करावा**

एल निनोसंदर्भात आपण तयारी करत आहोत. राज्यावर त्याचा परिणाम होईल आणि टास्कफोर्स आपण तयार केला आहे. जलसंधारणावर आपण भर दिला आहे. पाऊस कमी असला तरी आपण मार्ग काढूयात. राज्य सरकारच्या सल्ल्याच्या आधारे पेरणी केली तर दुबार पेरणीची वेळ येणार नाही. शेतकऱ्यांनी संयम ठेवावा, ॲडव्हायजरीकडे लक्ष द्यावे, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

## इराण स्ट्रेट ऑफ होर्मुझ उघडणार ?

करारानुसार संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या (UNSC) प्रस्तावानुसार मंजूरी देण्याची योजना आहे. बातमीमध्ये म्हटले की जोपर्यंत अंतिम बोलणी सुरु होत होणार नाही, जोपर्यंत इराणचा अर्धा फंड रिलीज केला जात नाही. तेल निर्बंध हटवले जात नाहीत आणि नौदला नाकाबंदी हटवली जात नाही.

**मसुद्यात मिसाईल कार्यक्रमाचा उल्लेख नाही**

एक महत्वाची गोष्ट म्हणजे या मसुद्यात इराणच्या मिसाईल कार्यक्रमाचा आणि क्षेत्रिय संशस्र संघटनांचे इराणच्या असलेल्या पाठींब्यांच्या मुद्द्यांना या संपूर्णपणे या चर्चेच्या बाहेर ठेवले आहे. दुसरीकडे इस्राईलने आधीच स्पष्ट केले आहे की तो लेबनॉनच्या दक्षिण भागात आपली सैन्य कारवाईची मोहिम सुरुच ठेवणार आहे. तर दुसरीकडे एप्रिलमध्ये झालेली युद्धबंदी संपूर्ण अपरिणामकारक ठरली आहे.अनेक रिपोर्टसमध्ये म्हटले आहे की अमेरिका आणि इराण यांच्या संभाव्य शांतता कराराचे यश बऱ्याच प्रमाणात लेबनॉनच्या स्थितीवर अवलंबून राहणार आहे. हेजबोल्लाह सतत मागणी करत आहे की इस्रायलने लेबनॉनमधून संपूर्णपणे सैन्य माघारी घ्यावे.

## मोहन भागवत थोडक्यात बचावले !

यंत्रणांना माहिती दिली. टूंडला जंक्शनवर रेल्वे सुरक्षा बल, राजकीय रेल्वे पोलीस आणि स्थानिक प्रशासन अलर्ट मोडवर होतं.ट्रेन स्टेशनवर पोहोचताच सुरक्षा बंदोबस्त अजून मजबूत करण्यात आला. अधिकाऱ्यांनी कोचच्या आत जाऊन परिस्थितीची पाहणी केली. सुरक्षा कारणांमुळे मोहन भागवत यांना ट्रेनमधून खाली उतरु दिलं नाही. आवश्यक चौकशी आणि औपचारिकता पूर्ण केल्यानंतर ट्रेनला निर्धारित वेळेपेक्षा थोड्या उशिराने नवी दिल्लीसाठी रवाना केलं. या घटनेनंतर आरपीएफ आणि जीआरपीच्या संयुक्त टीम्सनी संबंधित रेल्वे स्थानकाच्या आसपास चौकशी सुरु केली आहे. आसपासच्या परिसरातील संशयास्पद हालचालींची माहिती गोळा केली जात आहे.

# बिरोबाचीवाडीत प्रभाग रचनेच्या 'पंचनाम्या'वर प्रशासनाचे मौन

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

पाटस - प्रतिनिधी

गणेश गावडे






**पाटस :** दौंड तालुक्यातील बिरोबाचीवाडी सर्वसाधारण ग्रामपंचायतीच्या आगामी निवडणुकीसाठी प्रभाग निहाय आरक्षण सोडत आज जाहीर करण्यात आली आहे. सरपंच पदाचे आरक्षण आधीच जाहीर झाले असून, आता एकूण ३ प्रभागांमधील ९ सदस्य जागांचे आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. या प्रक्रियेदरम्यान प्रभाग क्रमांक १ आणि २ मध्ये अनुसूचित जातीची लोकसंख्या अगदी समान असल्याने, पारदर्शकतेसाठी एका शाळकरी मुलाच्या हाताने 'ईश्वर चिठ्ठी' (लॉटरी) काढून प्रभाग क्रमांक १ चे आरक्षण अंतिम करण्यात आले. मात्र, दुसरीकडे गावातील वादग्रस्त प्रभाग रचनेबाबत अर्जदारांनी घेतलेल्या तीव्र हरकतींवर प्रशासनाकडून अद्याप कोणताही निकाल किंवा अहवाल मिळालेला नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार शुक्रवार, दिनांक १२ जून २०२६ रोजी सकाळी ठीक १०:०० वाजता बिरोबाचीवाडी ग्रामपंचायत कार्यालयात विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. तहसिलदार यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली ही आरक्षण सोडत काढण्यात आली. या ग्रामसभेला गावातील ठराविकच नागरिक उपस्थित होते. २०११ च्या जनगणनेनुसार बिरोबाचीवाडी गावाची एकूण लोकसंख्या २,१८६ एवढी आहे. यामध्ये अनुसूचित जातीची (S.C.) लोकसंख्या १४१, तर अनुसूचित जमातीची (S.T.) लोकसंख्या १०२ इतकी आहे. मागील निवडणुकीच्या वेळी अनुसूचित जातीचे पुरुष आरक्षण प्रभाग क्रमांक ३ मध्ये होते, त्यामुळे नियमाप्रमाणे यावेळी हे फिरते आरक्षण प्रभाग क्रमांक १ मध्ये जाणे अपेक्षित होते. परंतु, यंदा प्रभाग क्रमांक १ आणि प्रभाग क्रमांक २ या दोन्ही प्रभागांमध्ये अनुसूचित जातीची लोकसंख्या प्रत्येकी ३०-३० अशी समान आढळली. अखेर हा पेच सोडवण्यासाठी आणि प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता राखण्यासाठी उपस्थित असलेल्या एका शाळकरी मुलाला पुढे बोलावून त्याच्या हाताने 'ईश्वर चिठ्ठी' काढण्यात आली. या चिठ्ठीमध्ये प्रभाग क्रमांक १ चे नाव निघाल्यामुळे अनुसूचित जातीच्या महिला उमेदवाराचे आरक्षण प्रभाग क्रमांक १ मध्ये निश्चित झाले. तसेच ३ प्रभागांतून एकूण ९ पैकी ६ जागेवर आरक्षण जाहीर झाले. आजची ही संपूर्ण आरक्षण सोडत प्रक्रिया शासकीय नियमांनुसार पार पडली. यावेळी अध्यासी अधिकारी म्हणून अविनाश खैरे (विस्तार अधिकारी, पंचायत समिती दौंड), ग्राम महसूल अधिकारी संजय खाडे आणि ग्रामपंचायत अधिकारी (BLO) सुरेखा सोनवणे यांनी उपस्थित राहून सर्व कामकाज पाहिले. ग्रामसभेत अधिकृत आरक्षण आणि पुढील कार्यक्रम जाहीर झाला असला, तरी जुन्या प्रभाग रचनेच्या तक्रारीवर जोपर्यंत ठोस निर्णय येत नाही, तोपर्यंत निवडणूक प्रक्रियेतील संभ्रम आणि गावातील राजकीय संघर्ष कायम राहण्याची चिन्हे आहेत.

महसूल विभागाचा सावळागोंधळ आणि 'ऑफिस रिपोर्ट'चा वाद कायम: आरक्षणाची प्रक्रिया पार पडली असली, तरी 'दैनिक चालु वार्ता'ने उघडकीस आणलेल्या प्रभाग रचनेच्या मोठ्या घोटाळ्याचा वाद अजूनही शमलेला नाही. महसूल विभागाच्या तलाठ्यांनी प्रत्यक्ष गावात न येता केवळ कार्यालयात बसूनच प्रभाग रचनेचा नकाशा तयार केल्याचा (ऑफिस रिपोर्ट) गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला होता. या नवीन आणि सदोष रचनेमध्ये वॉर्ड क्रमांक ३ ची रचना केवळ ३० ते ३५ मतदारांपुरतीच मर्यादित ठेवून विशिष्ट सोयीसाठी हा घाट घातल्याचा आरोप झाला होता, तर वॉर्ड क्रमांक १ मध्ये पाटसचे ३५ ते ४० 'बाहेरचे' मतदार नियमबाह्यरीत्या घुसविण्यात आल्याचे समोर आले होते.

या मनमानी कारभाराविरोधात सामाजिक कार्यकर्ते जयदीप गावडे, माजी ग्रा.पं. सदस्य नागेश म्हस्के, ग्रा.पं. सदस्य महेश खारतुडे, माजी सरपंच बाळासाहेब खारतुडे, ॲड संकेत वायाळ तसेच पत्रकार गणेश गावडे या प्रमुख ६ अर्जदारांनी तहसिलदार यांचेकडे लेखी तक्रार केली होती. उपविभागीय अधिकारी (SDO) यांच्याकडे २१ एप्रिल रोजी झालेल्या सुनावणीत सर्व अर्जदारांचे त्रुटींबाबत एकमत झाले होते. तलाठ्यांनी केलेली सदोष प्रभाग रचना रद्द करून जुनीच प्रभाग रचना कायम ठेवावी, अशी एकमुखी मागणी सर्वांनी केली होती. परंतु, धक्कादायक बाब म्हणजे या गंभीर प्रकरणावर सुनावणी होऊन महिना उलटला तरी अर्जदारांच्या या हरकतींवर प्रशासनाकडून अजून कोणताही निकाल किंवा अंतिम अहवाल देण्यात आलेला नाही. हा निकाल प्रलंबित असतानाच घाईघाईने आरक्षणाची सोडत काढण्यात आल्याने ग्रामस्थांनी महसूल विभागाच्या पारदर्शकतेवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

# प्रशासकीय नावाचा गैरवापर करणारे झारखंडमध्ये जेरबंद

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

पालघर - प्रतिनिधी

मिलिंद चुरी



## 'जिल्हाधिकारी' बनून फसवणुकीचा डाव; पालघर पोलिसांनी कट उधळला

**पालघर :** पालघर जिल्हाधिकाऱ्यांच्या नावाने बनावट व्हॉट्सॲप खाते तयार करून एका नागरिकाची ५० हजार रुपयांची फसवणूक करणाऱ्या दोन आरोपींना पालघर पोलिसांनी झारखंड राज्यातून अटक केली असून, गुन्ह्यातील अपहार झालेली संपूर्ण रक्कम हस्तगत करण्यात यश मिळविले आहे.

सायबर फसवणुकीच्या या प्रकरणात वाघुळसार,पालघर येथील विनीतकुमार मुंशीलाल मीणा यांना व्हॉट्सॲपवर पालघरच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या नावाने संदेश पाठविण्यात आला होता. संबंधित व्यक्तीने जिल्हाधिकाऱ्यांचा फोटो प्रोफाइलवर लावून स्वतःची खोटी ओळख निर्माण केली आणि विश्वास संपादन करत ५० हजार रुपये पाठविण्याची विनंती केली. त्यावर विश्वास ठेवून मीणा यांनी संबंधित खात्यावर रक्कम वर्ग केली. नंतर फसवणुकीचा प्रकार उघडकीस आल्यानंतर त्यांनी सायबर पोलिसांकडे तक्रार दाखल केली. त्यानुसार गुन्हा नोंदवून सायबर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि बँक व्यवहारांचा मागोवा घेत तपासाची चक्रे वेगाने फिरविली. तपासादरम्यान आरोपी बलवंतकुमार कमलप्रसाद मंडल (वय २६) आणि राजुकुमार दुखन रवानी (वय २२), दोघेही धनबाद (झारखंड) येथील असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांच्या विशेष पथकाने झारखंडमध्ये जाऊन दोघांना अटक केली. तसेच फसवणुकीतून मिळालेली ५० हजार रुपयांची संपूर्ण रक्कम हस्तगत करण्यात आली.

सायबर गुन्ह्यांमध्ये तांत्रिक तपासाच्या आधारे अल्पावधीत आरोपींपर्यंत पोहोचून संपूर्ण रक्कम जप्त करण्यात आल्याने पालघर पोलिसांच्या कार्यक्षमतेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक यतीश देशमुख आणि अपर पोलीस अधीक्षक विनायक नरळे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस स्टेशन व स्थानिक गुन्हे शाखेच्या संयुक्त पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# दापक्यात मुख्याध्यापक भानुदास वासरे यांना भावपूर्ण निरोप

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

उदगीर - प्रतिनिधी

अविनाश देवकते

## गुणवंत विद्यार्थ्यांचा रोख पारितोषिकांसह गौरव



## युवा उद्योजक आनंद धुळगंडे यांच्याकडून सलग दुसऱ्या वर्षी गुणवंतांचा सन्मान; शिक्षण व समाजसेवेच्या उपक्रमांचे सर्वत्र कौतुक

**लातूर (उदगीर) :** सीमा भागातील कमलनगर तालुक्यातील दापका येथील सरकारी माध्यमिक शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असलेले भानुदास वासरे यांची बदली होऊन ते सरकारी माध्यमिक शाळा, औराद येथे रुजू झाले आहेत. त्यांच्या निरोप समारंभासह सन २०२६ च्या दहावी बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचे औचित्य साधून ११ जून रोजी सरकारी माध्यमिक शाळा, चवरदापका येथे विशेष कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमात भानुदास वासरे यांचा भावपूर्ण सत्कार करण्यात आला. तसेच दहावी बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा रोख पारितोषिके, सन्मानचिन्हे व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. या सत्कार समारंभासाठी शाळेचे माजी विद्यार्थी व युवा उद्योजक आनंद बळीराम धुळगंडे (स्वराज्य इंडस्ट्री, पुणे) यांनी पुढाकार घेतला. प्रथम क्रमांकाच्या विद्यार्थ्यास ७ हजार रुपये, तर द्वितीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यास ५ हजार रुपये रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक भोसले होते. यावेळी रमेश पाटील, बालाजी घरडे, राम रावणगावे, भगवान जाधव, ग्रामपंचायत सदस्य संतोष जाधव, अंकुश वाडीकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

भानुदास वासरे यांनी गेली सहा वर्षे शाळेचे मुख्याध्यापक म्हणून कार्य करताना विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मोलाचे योगदान दिले. विद्यार्थीकेंद्रित कार्यपद्धती, शिक्षकांशी सुसंवाद आणि शाळेच्या प्रगतीसाठी केलेल्या प्रयत्नांमुळे त्यांनी विद्यार्थीप्रिय मुख्याध्यापक म्हणून वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या कार्याचा गौरव उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून केला.

गुणवंत विद्यार्थ्यांना सलग दुसऱ्या वर्षी रोख पारितोषिकांच्या माध्यमातून प्रोत्साहन देणारे युवा उद्योजक आनंद धुळगंडे यांचेही यावेळी विशेष कौतुक करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत शिक्षण क्षेत्राला हातभार लावण्याच्या त्यांच्या उपक्रमामुळे परिसरात त्यांचे अभिनंदन होत आहे. यावेळी मोहन देवकते यांचा देखील विशेष सत्कार करण्यात आला. दापका येथील प्राथमिक शाळेत सहा महिने प्रभारी मुख्याध्यापक म्हणून त्यांनी यशस्वीपणे जबाबदारी सांभाळली होती.

सध्या ते सीआरसी तोरणा येथे कार्यरत असून त्यांच्या कार्यकाळातील योगदानाचा गौरव कार्यक्रमात करण्यात आला. कार्यक्रमास प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक रोहिदास म्हैत्रे, वसंत विलासपुरे, शेख मुक्तार, शीला कदम, अर्चना शिंदे, स्नेहा बिरादार, ललिता भेंडे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवनाथ गायकवाड यांनी केले, तर आभार प्रदर्शन संजीवकुमार बिरादार यांनी केले. शिक्षक, विद्यार्थी आणि ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत कार्यक्रम आनंदी व भावनिक वातावरणात संपन्न झाला.

# दौंडच्या विकासासाठी आमदार राहुल कुल यांचा जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठपुरावा

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

दौंड - प्रतिनिधी

अंकुश काळे



## वाहतूक कोंडी, क्रीडा संकुल, उपबाजार आवार, तलाव निर्मिती, वृक्षलागवड आणि शेतकऱ्यांच्या ७/१२ प्रश्नांवर विशेष बैठका घेण्याची मागणी

**दौंड :** दौंड मतदारसंघातील अत्यंत महत्त्वाचे पायाभूत प्रकल्प, शेतकऱ्यांचे प्रलंबित प्रश्न आणि क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी आमदार राहुल कुल यांनी पुणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांची प्रत्यक्ष भेट घेतली. या भेटीदरम्यान दौंड तालुक्यातील विविध सहा महत्त्वपूर्ण विषयांवर संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत तात्काळ विशेष बैठका आयोजित करण्याची मागणी आमदार कुल यांनी निवेदनाद्वारे केली.

**उन्नत मार्गाच्या कामादरम्यान वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पूर्वनियोजन**

पुणे-सोलापूर (हडपसर-यवत) व पुणे-शिरूर रस्त्यावरील प्रस्तावित उन्नत मार्गाचे काम लवकरच सुरूहोत आहे. हे काम सुरू झाल्यानंतर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होण्याची शक्यता लक्षात घेऊन सर्व संबंधित विभागांची संयुक्त बैठक घेऊन पर्यायी रस्त्यांचे नियोजन करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली.

**ग्रामीण भागात उपक्रीडा संकुल उभारणीसाठी शासकीय जागेची मागणी**

दौंड तालुक्यातील भांडगाव, खडकी, देऊळगाव राजे, पारगाव व पाटस येथे ग्रामीण भागातील खेळाडूंना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी उपक्रीडा संकुल उभारण्यात येणार आहे. त्यासाठी आवश्यक शासकीय जागा तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.

**केडगाव व पाटस येथे उपबाजार आवारासाठी जमीन उपलब्ध करून देण्याची मागणी**

कृषी उत्पन्न बाजार समिती, दौंड अंतर्गत शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी केडगाव व पाटस येथे उपबाजार आवार उभारण्याचे नियोजन आहे. यासाठी आवश्यक शासकीय जमीन विनामूल्य उपलब्ध करून देण्याबाबत प्रशासकीय कार्यवाही गतीने करण्याची मागणी करण्यात आली.

**भूजल पातळी वाढीसाठी नवीन तलाव निर्मितीला गती देण्याची मागणी**

दौंड तालुक्यातील पाटस, केडगाव, भांडगाव आणि ताम्हणवाडी परिसरातील भूजल पातळी वाढवण्यासाठी व पाणीटंचाईवर मात करण्यासाठी वन विभागाच्या हद्दीत नवीन तलाव उभारण्याचा प्रस्ताव आहे. या कामांना गती देण्यासाठी संबंधित विभागांची तातडीची बैठक आयोजित करण्याची मागणी करण्यात आली.

**'बिहार पॅटर्न'वर मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवडीसाठी विशेष बैठक**

मनरेगा अंतर्गत बिहार राज्यात यशस्वी ठरलेल्या 'बिहार वृक्षलागवड पॅटर्न'च्या धर्तीवर दौंड विधानसभा मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यासाठी आवश्यक निधी व प्रशासकीय मंजुरीबाबत विशेष बैठक घेण्याची मागणी करण्यात आली.

**शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यांवरील वनक्षेत्र नोंदी अद्यावत करण्याची मागणी**

पुणे जिल्ह्यातील आणि विशेषतः दौंड तालुक्यातील शेतीसाठी वाटप केलेल्या वन जमिनींच्या संदर्भात शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावरील वनक्षेत्राच्या नोंदी अद्यावत करून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी महसूल व वन विभागाची संयुक्त बैठक आयोजित करण्याची मागणी करण्यात आली.


जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी आमदार राहुल कुल यांनी मांडलेल्या सर्व मागण्या सकारात्मकतेने ऐकून घेतल्या. तालुक्याच्या दृष्टीने हे सर्व विषय अत्यंत महत्त्वाचे असल्याने संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत लवकरच विशेष बैठका आयोजित करण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

# ❋ प्रेरणादायी गोष्ट ❋

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

## वारा आणि दिवा

एका रात्री एक लहानसा दिवा मंद उजेडात जळत होता.
तेवढ्यात एक वारा जोरात वाहू लागला.
वाऱ्यानं हसत विचारलं
'एवढ्या छोट्या ज्योतीनं तू काय उजळणार?
माझ्या एका झोतानं तू विझून जाशील!'
**दिवा शांतपणे म्हणाला,**
'कदाचित मी मोठा नाही... पण माझा प्रयत्न अंधार हटवायचा आहे.
तू माझ्यावर हस, पण मी विझेपर्यंत प्रकाश देणं थांबवणार नाही.'
वारा आणखी जोरात वाहू लागला,
पण दिवा वाकला, तरीही पेटलेलाच राहिला.
थोड्या वेळानंतर वारा शांत झाला.
**दिवा म्हणाला,**
'तुझी ताकद मोठी होती, पण माझा हेतू स्पष्ट होता.
म्हणून मी टिकून राहिलो.'
**गोष्ट सांगते:**
'जीवनात परिस्थिती कितीही कठीण आली तरी,
जर आपला हेतू प्रामाणिक आणि ध्येय स्पष्ट असेल,
तर कोणताही 'वारा' तुम्हाला विझवू शकत नाही.'
**थोडक्यात संदेश:**
'अडचणी येतात प्रकाश थांबवायला नाही,
तर तुमचा प्रकाश किती मजबूत आहे हे दाखवायला.'



## ❋ सुविचार ❋

'संधी प्रत्येक सकाळी तुमचं दार ठोठावते,
पण तुम्ही झोपलेले असाल तर ती निघून जाईल.

## जाहिर सूचना

दिनांक : १३/०६/२०२६

नमस्कार,

दै चालु वार्ता कडून जाहीर करण्यात येथे की जर आमचा म्हणजेचं दै चालु वार्ताचा प्रतिनिधी आहे म्हणून कोणी दावा करत असेल तर त्याचं ID कार्ड पाहू शकता किंवा नियुक्ती लेटर सध्या जे आमचे पत्रकार आहेत त्याच्याकडे चालू कालावधीचे ID कार्ड किंवा नियुक्ती लेटर असतं तेंच आमचे पत्रकार आहेत. (कालावधी संपलेले ID किंवा नियुक्ती लेटर असेल आणि ते दै चालु वार्ताचा प्रतिनिधी असल्याचा दावा करत असतील तर ते खोटं आहे. तर आपण आमच्या कार्यालयात खालील नं वर संपर्क करू शकता.) जर कालावधीच्या आतील त्यांच्याकडे ID किंवा नियुक्ती लेटर नसेल तर ते सध्या आमचे म्हणजे दै चालु वार्ताचे अधिकृत पत्रकार नाहीत. जरी त्यांच्या पेपरला बातम्या लागत असतील तरीही ते अधीकृत नाहीत (बातम्या पत्रकारच्या नावानी त्यांनी केलेल्या विनंती मुळे लावल्या जातात.)

**टीप :** दै चालु वार्ताच नियुक्ती लेटर किंवा ID ओरिजिनल आहे कसं कळणार. ओरिजिनल ID व नियुक्तीलेटर वर युन्कि रेफरन्स नं आहे जों Ref पासून सुरु होतो.

कार्यालय : हंडेवाडी रोड, हडपसर पुणे - ४११०२८, मो ९३७३५०४७४८

This Daily Printed, Published and Owned by **Dnyanoba Sudhakar Lokhande Patil** Printed at Girish Printers and Paper Converters, 150, Shaniwar Peth, Near Amruteshwar Mandir, Pune (M.S.)-411030 and Published at Flat No.806, 8 th Floor, Ratan Neptune, Handewadi Road, Hadapsar, Pune (M.S.)-411028 ■ **Editor : Dnyanoba Sudhakar Lokhande Patil** ■ Mob No.: **9373504748** ■ Email **dainikchaluwartha@gmail.com** ■ RNI No.: MAHMAR/2021/82895 (JURISDICTION AT PUNE)

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक **श्री.ज्ञानोबा सुधाकर लोखंडे पाटील** यांनी गिरीष प्रिंटर्स अँड कन्व्हर्टर्स, १५०, शनिवार पेठ, अमृतेश्वर मंदिराजवळ, पुणे (महाराष्ट्र)- ४११०३० येथे छापून फ्लॅट नं.८०६, ८ वा मजला, रतन नेपच्युन, हंडेवाडी रोड, हडपसर, पुणे (महाराष्ट्र)-४११०२८ येथून प्रकाशित केले. ■ **संपादक - श्री.ज्ञानोबा सुधाकर लोखंडे पाटील** ■ मो.नं.**9373504748** ■ Email - **dainikchaluwartha@gmail.com** ■ RNI No.: MAHMAR/2021/82895 (सर्व वाद पुणे न्याय कक्षेत)




# झरी ग्रामपंचायतीतील कथित आर्थिक गैरव्यवहारांची सखोल चौकशी करा.. - सचिन पाटील उपसरपंच झरी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
देगलूर - प्रतिनिधी
संतोष मंनधरणे

**देगलूर :** देगलूर तालुक्यातील मौजे झरी येथील ग्रामपंचायतीमध्ये विविध विकासकामांसाठी प्राप्त झालेल्या निधीच्या वितरणात मोठ्या प्रमाणात अनियमितता व आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तक्रारीनुसार, ग्रामपंचायतीमार्फत राज्य शासन, केंद्र शासन तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांकडून प्राप्त झालेल्या विविध विकासनिधींचा वापर कागदोपत्री दाखविण्यात आला असला तरी प्रत्यक्षात अनेक कामे निकृष्ट दर्जाची, अपूर्ण किंवा अस्तित्वात नसल्याचा आरोप उपसरपंच सचिन पाटील यांनी केला आहे. ग्रामविकासासाठी मंजूर झालेल्या निधीचा तत्कालीन ग्रामसेवक, सरपंच, कंत्राटदार व काही गाव पुढाऱ्यांच्या संगनमताने अपहार झाल्याची शंका व्यक्त करण्यात



आली आहे.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, अनेक खर्चांच्या नोंदी संबंधित ग्रामसभेच्या मंजुरी शिवाय करण्यात आल्या असून काही निवडक व्यक्ती व व्यापाऱ्यांच्या नावावर बिले काढून निधीची उचल करण्यात आली. संबंधित व्यापाऱ्यांकडे शासनमान्य परवाने होते का, प्रत्यक्षात वस्तू किंवा सेवा पुरविण्यात आल्या होत्या का, याचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

ग्रामपंचायतीच्या वित्त आयोग निधी, ग्रामनिधी तसेच इतर सर्व योजनांमधून मंजूर झालेल्या प्रस्तावांची प्रत्यक्ष पडताळणी करून एप्रिल २०२५ ते जून २०२६ या कालावधीतील जमा-खर्चाचा तपशील तपासावा, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. याशिवाय, दाखविण्यात आलेल्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करून व्हाऊचर, बिले आणि कामांची गुणवत्ता यांची तुलना करण्याची मागणीही करण्यात आली आहे.


संबंधित प्रकरणात दोषी आढळणाऱ्या तत्कालीन ग्रामसेवक, कंत्राटदार तसेच निधी स्वीकारणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करून फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी घरी गावचे उपसरपंच सचिन पाटील यांनी केली आहे. झरी ग्रामपंचायतीतील कथित आर्थिक गैरव्यवहाराची निष्पक्ष व सखोल चौकशी करून सत्य समोर आणावे, अशी अपेक्षा झरी गावचे उपसरपंच सचिन पाटील यांनी गटविकास अधिकारी देगलूर यांना निवेदना मार्फत कळविले आठ दिवसात अधिकाऱ्यांनी संबंधितावर कारवाई केली नाही तर आमरण उपोषणाचा इशारा सचिन पाटील उपसरपंच यांनी प्रशासनाला दिला आहे.

# धोंड्याचे जेवण म्हणजे..? परंपरा की प्रतिष्ठेची स्पर्धा

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
मोहोळ - प्रतिनिधी

**मोहोळ :** अधिकमासनिमित्त साजरे केले जाणारे धोंड्याचे जेवण यंदा सर्वत्र चर्चेचा विषय ठरत आहे. नातेसंबंध दृढ करण्यासाठी आणि जावयाचा सन्मान करण्यासाठी सुरू झालेली ही परंपरा आता सोशल मीडियाच्या प्रभावामुळे प्रतिष्ठा, दिखावा आणि आर्थिक स्पर्धेचे स्वरूप धारण करत असल्याची चिंता समाजातील विविध स्तरांतून व्यक्त होत आहे.

धोंड्याचे जेवण हे पूर्वी कुटुंबापुरते मर्यादित असायचे. आता मात्र इंस्टाग्राम रील्स, फेसबुक पोस्ट आणि युट्यूब व्हिडिओच्या माध्यमातून जावयाचे स्वागत, पायधुणी करण्यापासून थेट महागड्या भेटवस्तू अन सोन्या चांदीचे दागिने, भव्य जेवणावळी आणि सजावटीचे प्रदर्शन मोठ्या प्रमाणात होताना दिसत आहे. या व्हिडिओंना लाखो व्ह्यूज मिळत असले तरी त्यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक अपेक्षा आणि आर्थिक दडपणाकडे दुर्लक्ष होत असल्याचे जाणकारांचे मत आहे. विशेष




म्हणजे - धोंड्याच्या जेवणामागे पूर्वी प्रेम, आपुलकी आणि जावयाचा सन्मान हा मुख्य उद्देश होता. मात्र आता अनेक ठिकाणी कोण किती प्रकारचे जेवण करतोय किती प्रकारचे जेवण ठरवतोय अन किती महागडी भेटवस्तू देतोय यावरच जोरदार चर्चा रंगताना दिसत आहे. परिणामी परंपरेचा मुळ हेतू मागे पडत असून प्रदर्शनालाच अधिक महत्त्व मिळत आहे. सध्या ग्रामीण भागातील अनेक कुटुंबे शेती, मोलमजुरी आणि लहान व्यवसायावर अवलंबून आहेत. अशा परिस्थितीत नातेवाईकांना बोलावणे, आहेर देणे, भेटवस्तू खरेदी करणे आणि कार्यक्रमाचे आयोजन करणे यासाठी मोठा खर्च करावा लागतो. काही कुटुंबे सामाजिक दबावामुळे कर्ज काढून किंवा बचतीतील रक्कम खर्च करून हे कार्यक्रम पार पाडत असल्याची उदाहरणे देखील समोर येत आहेत. पूर्वी एखाद्या गावापुरती मर्यादित राहणारी परंपरा आता सोशल मीडियामुळे जगासमोर येत आहे. एखाद्या कुटुंबाने जावयाला सोन्याची अंगठी किंवा महागडी भेट दिली तर इतरांवरही तशाच अपेक्षा निर्माण होतात. त्यामुळे आर्थिक क्षमतेपेक्षा जास्त खर्च करण्याची मानसिकता वाढताना दिसत आहे. सामाजिक कार्यकर्त्यांच्या मते, या वाढत्या अपेक्षांचा सर्वाधिक परिणाम मुलींवर होऊ शकतो. एवढेच नाही तर माहेरकडून अपेक्षेइतका मानपान झाला नाही, तर काही ठिकाणी तुलना, टोमणे किंवा मानसिक दबाव निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे महिलांमध्ये अपराधीपणाची भावना आणि कौटुंबिक तणाव वाढू शकतो.

अनेक ठिकाणी हुंडा प्रथा अजूनही विविध स्वरूपात अस्तित्वात आहे. अशा परिस्थितीत महागडे आहेर, सोन्याच्या भेटवस्तू आणि भव्य कार्यक्रमांच्या वाढत्या अपेक्षा समाजासाठी चिंतेचा विषय ठरत आहेत. यामुळे वैवाहिक नात्यांमध्ये तणाव निर्माण होण्याची भिती व्यक्त केली जात आहे. सामाजिक कार्यकर्त्यांच्या ही परंपरा जपणे महत्त्वाचे असले तरी त्या आपल्या आर्थिक क्षमतेनुसार आणि स्वेच्छेने साजऱ्या व्हायला हव्यात. प्रेम सन्मान आणि आपुलकी व्यक्त करण्यासाठी आर्थिक प्रदर्शन आवश्यक नसते. परंपरा जपत असताना त्या कोणावर अन्याय, आर्थिक भार किंवा मानसिक ताण निर्माण करत नाहीत ना ? याचाही विचार होणे गरजेचे आहे. अधिकमासाच्या निमित्ताने सुरू झालेल्या या चर्चेमुळे परंपरा आणि दिखावा यातील फरक ओळखून समाजाने अधिक संवेदनशीलतेने विचार करण्याची गरज अधोरेखित होत आहे. 'धोंड्याचे जेवण' ही परंपरा नातेसंबंध दृढ करणारी ठरावी, आर्थिक स्पर्धा वाढवणारी नव्हे, अशी अपेक्षा अनेक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# पेरणीपूर्वी बियाण्याची उगवण क्षमता तपासा - शिवाजी मिरासे

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
उमरी - प्रतिनिधी
श्रीनिवास मुक्कावार

**उमरी :** खरीप हंगामातील पेरणीपूर्वी शेतकऱ्यांनी घरचे असो वा बाजारातून खरेदी केलेले बियाणे असो, त्याची उगवण क्षमता तपासणी करूनच पेरणी करावी, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी शिवाजी मिरासे यांनी केले आहे. यंदा एल-निनोच्या संभाव्य प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. अशा परिस्थितीत उपलब्ध बियाण्याची गुणवत्ता व उगवण क्षमता तपासणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. मिरासे यांनी सांगितले

## अशी करा गोणपाट पद्धतीने उगवण क्षमता तपासणी

उगवण क्षमता तपासण्यासाठी गोणपाट पद्धत अत्यंत सोपी असून ती शेतकरी घरच्या घरी करू शकतात. यासाठी बियाण्यांमधून १०० दाण्यांचा नमुना निवडावा. हे दाणे ओल्या गोणपाटामध्ये व्यवस्थित गुंडाळून सावलीत किंवा उबदार ठिकाणी ठेवावेत. पुढील ६ ते ७ दिवस गोणपाट ओलसर राहील याची काळजी घेत अधूनमधून पाणी शिंपडावे. त्यानंतर रुजलेल्या बियांची संख्या मोजावी. १०० पैकी ७० किंवा त्यापेक्षा जास्त बिया उगवल्यास संबंधित बियाणे पेरणीसाठी योग्य व दर्जेदार समजले जाते. बियाणे उगवण क्षमता तपासणी करताना शेलगाव येथील कृषिधन शेतकरी गटातील शेतकरी.

की, उगवण क्षमता चाचणीमुळे बियाण्याच्या दर्जाबाबत खात्री मिळते तसेच ते पेरणीयोग्य आहे की नाही हे समजते. बियाण्याची उगवणक्षमता किती आहे याचा अंदाज आल्याने आवश्यक बियाण्याचे प्रमाण निश्चित करता येते आणि प्रति एकर आवश्यक रोपसंख्या राखणे शक्य होते.

उगवण क्षमता आधीच तपासल्यामुळे निकृष्ट किंवा कमी उगवण असलेले बियाणे ओळखता येते. त्यामुळे नवीन बियाण्याची वेळेत व्यवस्था करून संभाव्य नुकसान टाळता येते. तसेच बियाण्यावरील अनावश्यक खर्च वाचून दुबार पेरणीची वेळ येत नाही. चांगली उगवण झाल्यास शेतातील सर्व रोपे जवळपास एकाच वेळी उगवतात. त्यामुळे पिकाची वाढ, फुलोरा आणि परिपक्वता एकसमान होऊन पिकाची जोमदार वाढ होते. योग्य रोपसंख्या व निरोगी उगवण यामुळे उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांना अधिक आर्थिक लाभ मिळतो. शेतकऱ्यांनी पेरणीच्या अगोदर घाईगडबडीत बियाणे खरेदी करण्याऐवजी किमान ७ दिवस आधी बियाणे खरेदी करावे, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी शिवाजी मिरासे यांनी केले आहे. बियाणे वेळेवर खरेदी केल्यास त्याची उगवण क्षमता तपासण्यासाठी पुरेसा कालावधी उपलब्ध होतो. उगवण क्षमता कमी आढळल्यास पर्यायी बियाण्याची व्यवस्था करता येते. त्यामुळे पेरणीचा हंगाम वेळेत पूर्ण होऊन दुबार पेरणी व आर्थिक नुकसान टाळता येते. तसेच अधिकृत विक्रेत्याकडून पावतीसह बियाणे खरेदी करण्याचा सल्लाही त्यांनी शेतकऱ्यांना दिला आहे.

# अमरावतीत दिव्यांग मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहात संपन्न

## रोजगारासाठी २५ दळणचक्की व ५० झेरॉक्स मशिनचे वाटप

## आमदार रविभाऊ राणा यांची प्रमुख उपस्थिती

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
अमरावती - प्रतिनिधी
संजय सरवटकर

**अमरावती :** सुप्रसिद्ध समाजसेवक प्रकाशजी साबळे यांच्या स्मृती सेवाश्रम, नया अकोला व प्रेमकिशोर सिकची चॅरिटेबल ट्रस्ट, वलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'दिव्यांग मार्गदर्शन कार्यशाळा' कार्यक्रम महाराष्ट्र विधानसभा आश्वासन समिती अध्यक्ष माननीय आमदार रविभाऊ राणा यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला. दिव्यांग बांधवांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या हेतूने या




कार्यक्रमात २५ दळणचक्की व ५० झेरॉक्स मशिनचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजक प्रकाशजी साबळे यांच्या सामाजिक कार्याचे आमदार रविभाऊ राणा यांनी विशेष कौतुक केले. दिव्यांग बांधवांच्या स्वावलंबनासाठीअशा उपक्रमांची गरज असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर व मोठ्या संख्येने दिव्यांग बांधव उपस्थित होते.

# जाचक अटी नकोत, सरसकट कर्जमाफी द्या

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन


## रोहित दादा पवारांच्या पंढरपूर आंदोलनातील मागण्या मान्य करा;

श्याम पाटील कपाळे (जिल्हाध्यक्ष किसान सेल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार) यांच्या नेतृत्वात निवेदन

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
शिराढोण - प्रतिनिधी
गजानन देवणे

**शिराढोण :** कर्जमाफी योजनेतील जाचक अटी शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणाऱ्या आहेत. त्यामुळे सर्व अटी रद्द करून राज्यातील प्रत्येक शेतकऱ्याला अटशिवाय कर्जमाफी द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार च्या वतीने शनिवारी नांदेडच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर निवेदनाद्वारे केली.

आमदार रोहित दादा पवार यांनी विठुरायाच्या पवित्र नगरी पंढरपूर येथे बळीराजाच्या प्रश्नासाठी अन्नत्याग आंदोलन पुकारले होते. त्यावेळी शेतकऱ्यांच्या बाजूने मांडलेल्या सर्व अटी व मागण्या सरकारने तातडीने मान्य कराव्यात, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) किसान सेल, नांदेडचे जिल्हाध्यक्ष श्याम पाटील कपाळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी यांना हे निवेदन दिले. 'बँकांच्या कर्जाबरोबरच सावकारांच्या कर्जातही शेतकरी अडकला आहे. पीककर्जाची मर्यादा, कर्जाची रक्कम, जमिनीचे क्षेत्र अशा अटी टाकून



उपजिल्हाधिकारी नांदेड यांना निवेदन देताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गट किसान सेलचे जिल्हाध्यक्ष श्याम पाटील कपाळे.

शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले जात आहे. २०१७ व २०१९ मधील कर्जमाफीतील पात्र शेतकऱ्यांना सुद्धा सरसकट कर्जमाफी मिळाली पाहिजे आता पारदर्शक आणि सरसकट कर्जमाफी हाच एकमेव पर्याय आहे,' असे कपाळे म्हणाले.

सरकारने याकडे दुर्लक्ष केल्यास राज्यव्यापी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

खालील ठळक मुद्दे बॉक्समध्ये घ्या........

ठळक मुद्दे :

१. कर्जमाफीतील उत्पन्न मर्यादा, क्षेत्र मर्यादा रद्द करा.

२. माननीय रोहित दादा पवार यांनी पंढरपूर येथे शेतकऱ्यांसाठी अन्नत्याग आंदोलनातील सर्व मागण्या तातडीने मान्य करा.

३. खाजगी सावकारांचे कर्जही माफीच्या कक्षेत आणा.

४. २०१७ व २०१९ मध्ये पात्र कर्जमाफी धारक शेतकऱ्यांना सुद्धा सरसकट कर्जमाफी मिळाली पाहिजे.

या सह निवेदना दिलेल्या सर्व अटी मान्य करून शेतकऱ्यांना सरसगट कर्जमाफी करावे ही निवेदनाच्या माध्यमातून प्रशासनाला मागणी करण्यात आली आहे.

# फाटा गावच्या जान्हवी ऊर्फ जनाबाई काकडे यांची PSI पदावर निवड

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
वसमत - प्रतिनिधी
बालाजी अडकीने

**वसमत :** 'परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी मनात जिद्द, ध्येय आणि मेहनतीची तयारी असेल तर यश निश्चित मिळते,' हे पुन्हा एकदा सिद्ध करून दाखवले आहे वसमत तालुक्यातील फाटा गावच्या कन्या जान्हवी ऊर्फ जनाबाई काकडे यांनी. पोलीस उपनिरीक्षक PSI पदाचे प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करून महाराष्ट्र पोलीस दलात अधिकारी म्हणून रुजू झालेल्या जान्हवी काकडे यांनी फाटा गावासह संपूर्ण वसमत तालुक्याचे नाव राज्यभरात उज्वल केले आहे.

ग्रामीण भागातील एका सामान्य कुटुंबातील मुलीने कठोर परिश्रम, अपार जिद्द आणि अविरत संघर्षाच्या जोरावर खाकी वर्दीचे स्वप्न साकार केल्याने गावात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या या यशामुळे अनेक विद्यार्थिनींना नवी प्रेरणा मिळाली असून, 'स्वप्न मोठं असेल तर गाव लहान पडत नाही,' हे त्यांनी आपल्या कर्तृत्वातून दाखवून दिले आहे.



## जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या जोरावर गाठले यशाचे शिखर

## गिताई महिला पतसंस्थेकडून भव्य सत्कार

आजच्या स्पर्धेच्या युगात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. आर्थिक मर्यादा, अपुऱ्या सुविधा आणि मार्गदर्शनाचा अभाव यामुळे अनेकांची स्वप्ने अर्धवट राहतात. मात्र जान्हवी काकडे यांनी या सर्व अडथळ्यांवर मात करत ध्येय गाठले. त्यांच्या यशाने हे स्पष्ट झाले आहे की, ग्रामीण असो किंवा शहरी भागातील विद्यार्थी, यशासाठी आवश्यक असते ती फक्त जिद्द, आत्मविश्वास आणि सातत्यपूर्ण मेहनत. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल गिताई महिला पतसंस्था परिवारातर्फे त्यांचा विशेष सत्कार करून गौरव करण्यात आला. या सन्मान सोहळ्यात संस्थेचे प्रमुख मार्गदर्शक मधुकररावजी पाष्टे, व्यसनमुक्ती कार्यकर्ते बालाजी पाटील सूर्यवंशी, शिवभक्त बाबुराव येरगे, प्रतिष्ठित व्यापारी मारडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी जान्हवी काकडे यांच्या यशाचे कौतुक करत त्यांना पुढील सेवाकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी मान्यवरांनी सांगितले की,



'जान्हवी काकडे यांचे यश हे केवळ त्यांच्या कुटुंबाचे नाही, तर संपूर्ण फाटा गाव, वसमत तालुका आणि ग्रामीण भागातील प्रत्येक विद्यार्थ्याचे यश आहे. त्यांची यशोगाथा अनेक तरुण-तरुणींना नवी दिशा देणारी ठरेल.'

पोलीस दलात अधिकारी म्हणून रुजू होताना जान्हवी काकडे यांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, कुटुंबीय, शिक्षक आणि गावकऱ्यांना दिले. समाजसेवा आणि कायदा-सुव्यवस्था राखण्याचे कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. फाटा गावच्या या लेकीने मिळवलेले यश हे केवळ एका पदाची प्राप्ती नसून ग्रामीण भागातील मुलींच्या स्वप्नांना नवे बळ देणारे आहे. संघर्षाच्या वाटेवर चालत खाकीपर्यंत पोहोचलेली ही यशोगाथा आज अनेकांसाठी प्रेरणेचा दीप बनली आहे.

## चुटकुले

मास्तर : इंडिया गेट काय आहे?
मुलगा : बासमती तांदूळ.
मा : चारमिनार?
मु : सिगरेट.
मा : ताजमहाल?
मु : चहा.
मा : गाढवा! देशातील इतकी प्रख्यात स्थळं तुला माहिती नाहीत. जा, तुला नापास केलं. उद्या येताना वडिलांची सिग्नेचर आण.

दुसऱ्या दिवशी पोरगं चकचकीत कागदात गुंडाळलेलं पुडकं आणून टेबलावर ठेवतं.

मास्तर : हे रे काय?
पोरगं : बाबांची सिग्नेचर. आख्खी बाटली आणली.

मास्तर गहिवरून आले. पोराला छातीशी धरून म्हणाले, 'अरे वेडा कुठला. कोण म्हणतं तू नापास झाला? तुला शंभर पैकी शंभर!'




# राजगिरा म्हणजे काय आणि त्याचे फायदे





दै.चालु वार्ता वृत्तसेवा

राजगिरा म्हणजेच Amaranth seeds हे जरी आरोग्यदायी अन्न म्हणून लोकप्रिय असले तरी, हे प्राचीन धान्य हजारो वर्षांपासून जगाच्या काही भागांमध्ये आहाराचे मुख्य भाग आहे.

**परिचय**

राजगिरा अत्यंत पौष्टिक आहे. त्यात मँगनीज, मॅग्नेशियम, फॉस्फरस आणि लोह भरपूर प्रमाणात असते. फायबर आणि प्रथिनांचा उत्कृष्ट स्रोत असल्याने, राजगिरा वजन कमी करण्यास मदत करते. पोषणतज्ञांच्या म्हणण्यानुसार आपण आपल्या आहारात राजगिरा समाविष्ट केला पाहिजे.

यात एक प्रभावी पोषक घटक आहेत आणि अनेक प्रभावी आरोग्य फायद्यांशी संबंधित आहे.

**राजगिरा म्हणजे काय**

राजगिरा हा सुमारे ८,००० वर्षांपासून लागवड केलेल्या ६० पेक्षा जास्त विविध प्रजातींच्या धान्यांचा समूह आहे.

राजगिरा हे स्यूडोसेरिअल म्हणून वर्गीकृत आहे, याचा अर्थ असा की ते तांत्रिकदृष्ट्या गहू किंवा ओट्ससारखे अन्नधान्य नाही, परंतु ते पोषक तत्वांचा तुलनात्मक संच सामायिक करते आणि त्याच प्रकारे वापरले जाते.

आश्चर्यकारकपणे पौष्टिक गुणधर्म असण्याव्यतिरिक्त, हे पौष्टिक धान्य नैसर्गिकरित्या ग्लूटेन-मुक्त आणि प्रथिने, फायबर, सूक्ष्म पोषक आणि अँटिऑक्सिडंट्सने समृद्ध आहे.

राजगिरा अत्यंत पौष्टिक आहे. हे प्राचीन धान्य फायबर आणि प्रथिने, तसेच अनेक महत्त्वपूर्ण सूक्ष्म पोषक घटकांनी समृद्ध आहे. विशेषत: राजगिरा हा मँगनीज, मॅग्नेशियम, फॉस्फरस आणि लोहाचा चांगला स्रोत आहे.

**राजगिरा मध्ये असलेले पोषक घटक**

एक कप, २५० ग्रॅम शिजवलेल्या राजगिरामध्ये खालील पोषक घटक असतात

कॅलरीज: २५१, प्रथिने: ९.३ ग्रॅम

कर्बोदकांमधे: ४६ ग्रॅम, फॅट: ५.२ ग्रॅम

मँगनीज: शिफारस केलेले आहारातील सेवनाच्या १०५%

मॅग्नेशियम: शिफारस केलेले आहारातील सेवनाच्या ४०%

फॉस्फरस: शिफारस केलेले आहारातील सेवनाच्या ३६%

लोह: शिफारस केलेले आहारातील सेवनाच्या २९%

सेलेनियम: शिफारस केलेले आहारातील सेवनाच्या १९%

तांबे: शिफारस केलेले आहारातील सेवनाच्या १८%

मँगनीज मेंदूच्या कार्यासाठी विशेषत: महत्वाचे आहे आणि विशिष्ट न्यूरोलॉजिकल परिस्थितींपासून संरक्षण करते असे मानले जाते. इतकेच काय, राजगिरामध्ये फॉस्फरसचे प्रमाण जास्त असते, हाडांच्या आरोग्यासाठी महत्त्वाचे खनिज असते. त्यात लोह देखील भरपूर आहे, जे तुमच्या शरीराला रक्त निर्माण करण्यास मदत करते.

**राजगिऱ्याचे होणारे उपयोग**

राजगिरा हे आरोग्याला चालना देणारे अँटिऑक्सिडंट्सचा चांगला स्रोत आहे. एका अभ्यासात असे दिसून आले आहे की राजगिरा मध्ये विशेषत: फिनोलिक ॲसिडमध्ये जास्त आहे, जे वनस्पती संयुगे आहेत जे अँटिऑक्सिडेंट म्हणून कार्य करतात. यामध्ये गॅलिक ॲसिड, पी- हायड्रॉक्सीबेंझोइक ॲसिडआणि व्हॅनिलिक ॲसिड यांचा समावेश आहे, हे सर्व हृदयविकार आणि कर्करोग यांसारख्या आजारांपासून संरक्षण करण्यास मदत करू शकतात.

जळजळ ही एक सामान्य रोगप्रतिकारक प्रतिक्रिया आहे जी शरीराला दुखापत आणि संसर्गापासून संरक्षण करण्यासाठी तयार केलेली आहे. तथापि, जुनाट जळजळ दीर्घकालीन रोगास कारणीभूत ठरू शकते आणि कर्करोग, मधुमेह आणि स्वयंप्रतिकार विकारांसारख्या परिस्थितीशी संबंधित आहे. अनेक अभ्यासात असे आढळून आले आहे की राजगिरा शरीरात दाहक-विरोधी प्रभाव टाकू शकतो. राजगिरा जळजळ होण्याचे अनेक कारणे कमी करतो असे आढळून आले

राजगिरा शरीरात एक दाहक-विरोधी प्रभाव असू शकतो. राजगिरा कोलेस्टेरॉलची पातळी कमी करू शकते. कोलेस्टेरॉल हा चरबीसारखा पदार्थ आहे जो संपूर्ण शरीरात आढळतो. खूप जास्त कोलेस्टेरॉल रक्तात तयार होऊ शकते आणि रक्तवाहिन्या अरुंद होऊ शकते. आपण काही अतिरिक्त वजन कमी करण्याचा विचार करत असल्यास, आपण आपल्या आहारात राजगिरा खाण्याचा विचार करूशकता. राजगिरामध्ये प्रथिने आणि फायबरचे प्रमाण जास्त असते, जे दोन्ही तुमच्या वजन कमी करण्याच्या प्रयत्नांना मदत करू शकतात. एका अभ्यासात, उच्च प्रथिनेयुक्त भूक उत्तेजित करणारे हार्मीन घेरलिनची पातळी कमी करते असे आढळून आले.राजगिरामध्ये प्रथिने आणि फायबरचे प्रमाण जास्त असते, जे दोन्ही भूक कमी करण्यास आणि वजन कमी करण्यास मदत करतात. राजगिरा नैसर्गिकरित्या ग्लूटेन-मुक्त आहे. ग्लूटेन हा एक प्रकारचा प्रथिने आहे जो गहू, बार्ली, स्पेलेड आणि राय यासारख्या धान्यांमध्ये आढळतो.

इतर नैसर्गिकरित्या ग्लूटेन-मुक्त धान्यांमध्ये ज्वारी, क्विनोआ, बाजरी, ओट्स, बकव्हीट आणि तपकिरी तांदूळ यांचा समावेश होतो.

**राजगिरा कसा वापरावा**

राजगिरा तयार करणे सोपे आहे आणि विविध पदार्थांमध्ये वापरले जाऊ शकते.

राजगिरा शिजवण्यापूर्वी, तुम्ही ते पाण्यात भिजवून आणि नंतर एक ते तीन दिवस धान्य अंकुरू देऊन अंकुरू शकता.

अंकुर फुटल्याने धान्य पचायला सोपे होते. राजगिरा शिजवण्यासाठी, ३:१ च्या प्रमाणात राजगिरा आणि पाणी एकत्र करा. उकळी येईपर्यंत ते गरम करा, नंतर उष्णता कमी करा आणि सुमारे २० मिनिटे उकळू द्या, जोपर्यंत पाणी आटले जात नाही.

**निष्कर्ष**

राजगिरा हे पौष्टिक, ग्लूटेन-मुक्त धान्य आहे जे भरपूर फायबर, प्रथिने आणि सूक्ष्म पोषक तत्वे प्रदान करते. जळजळ कमी करणे, कोलेस्टेरॉलची पातळी कमी करणे आणि वजन कमी करणे यासह अनेक आरोग्य फायद्यांशी ते संबंधित आहे. तर हा होता राजगिरा आणि त्याचे फायदे मराठी माहिती निबंध. मला आशा आहे की आपणास राजगिरा आणि त्याचे फायदे हा निबंध माहिती लेख (Amaranth seeds information in Marathi) आवडला असेल. जर आपल्याला हा लेख आवडला असेल तर हा लेख आपल्या मित्रांसोबत शेअर करायला विसरू नका.

**महत्वाची टीप**

या लेखात सांगितलेली माहिती हि केवळ तुमच्या माहितीसाठी आहे. कोणताही उपाय करण्यापूर्वी वाचकाने त्यांच्या डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. ※※※※

# वाहनातच संसार, रस्त्यावरच आयुष्य!

## 'चार चाकांवरचे घर : मालवाहू वाहनातच ड्रायव्हर आणि कामगारांचा संसार'

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**राजगुरूनगर - प्रतिनिधी**

**जाकीर अन्सारी**




**राजगुरूनगर :** अर्थव्यवस्था चालवणारे ट्रक चालक आणि त्यांच्यासोबतचे कामगार अनेकदा अत्यंत कठीण परिस्थितीत जीवन जगत असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येते. छायाचित्रातील हे वाहन केवळ मालवाहतुकीचे साधन नसून चालक आणि कामगारांचे तात्पुरते घरच बनले आहे.

वाहनाच्या कंटेनरमध्ये राहण्याची, जेवण बनवण्याची, कपडे वाळत घालण्याची आणि विश्रांती घेण्याची व्यवस्था करण्यात आलेली दिसते. अनेक दिवस घरापासून दूर राहणाऱ्या या कामगारांसाठी हेच वाहन त्यांचे निवासस्थान बनते. उन्हाळा, पावसाळा किंवा हिवाळा अशा कोणत्याही परिस्थितीत त्यांचे जीवन रस्त्यावरच सुरू असते.

एका बाजूला देशभर वस्तूंचा पुरवठा सुरळीत ठेवण्याची जबाबदारी हे चालक पार पाडतात, तर दुसऱ्या बाजूला त्यांना पुरेशा विश्रांतीगृहांचा, स्वच्छतागृहांचा आणि निवास सुविधांचा अभाव सहन करावा लागतो. त्यामुळे अनेकांना वाहनातच राहण्याशिवाय दुसरा पर्याय उरत नाही.

कामगारांच्या या वास्तवाकडे शासन आणि वाहतूक क्षेत्रातील संबंधित यंत्रणांनी गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. महामार्गांवर सुसज्ज विश्रांती केंद्रे, स्वच्छ पिण्याचे पाणी, स्नानगृहे व सुरक्षित निवास व्यवस्था उपलब्ध करून दिल्यास हजारो चालक आणि कामगारांचे जीवनमान सुधारू शकते. देशाचा माल वाहून नेणाऱ्या या हातांना केवळ रोजगार नव्हे, तर सन्मानाने जगण्याचा हक्कही मिळायला हवा.

# शिवाजी चौक दुधिया हनुमान मार्गावर फळ विक्रेते बेकायदेशीर पार्किंगचा विळखा?

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**उदगीर - प्रतिनिधी**

**संतोष रायफळे**



**उदगीर :** उदगीर शहरातील नांदेड बिदर रोड हा शहरातील दुहेरी रस्ता असून अत्यंत वर्दळीचा आणि महत्त्वाचा रोड म्हणून ओळखला जातो या मार्गावर बस स्टॅन्ड सारखे महत्त्वाचे ठिकाण असून शिवाजी चौक. यासारख्या महत्त्वाच्या ठिकाणी फळ विक्रेते बेकायदेशीर पणे वाहने पार्क केली जात आहेत त्यामुळे वाहतुकीची मोठ्या प्रमाणात कोंडी होत असून नागरिकांना अनेक अडचणीचा सामना करावा लागत आहे. विशेष म्हणजे रस्त्यावर उभे करण्यात येणाऱ्या वाहनामुळे फळ विकल्या त्यामुळे पदचाऱ्यांना चालण्यासाठी पुरेशी जागा मिळत नाही परिणामी नागरिकांना जीव धोक्यात घालून रस्त्यावरूनच प्रवास करावा लागत आहे. वाहतुकीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असतानाही पोलीस प्रशासन आणि नगरपालिके कडून कोणतेही ठोस कारवाई करण्यात येत नसल्याचे नागरिकाचे म्हणणे आहे. संबंधित विभागाने तातडीने लक्ष देऊन फळ विक्रेते व बेकायदेशीर पार्किंग हटवावे व वाहतूक सुरळीत करण्यासाठी आवश्यक उपयोजना कराव्यात अशी मागणी स्थानिक नागरिकाकडून करण्यात येत आहे.

# पालघरमध्ये तरुणीवर कोयत्याने जीवघेणा हल्ला

## प्रेमप्रकरणातून हल्ल्याचा संशय

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**पालघर - प्रतिनिधी**

**रवि राठोड**



**पालघर :** पालघर शहरातील गोल्ड टॉकीज परिसरात शुक्रवारी सायंकाळी २७ वर्षीय तरुणीवर कोयत्याने जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या तरुणीवर रुग्णालयात उपचार सुरू असून तिची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळाली आहे. जखमी तरुणी स्नेहल सावंत (वय २७) या जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे लिपिक म्हणून कार्यरत आहेत. प्राथमिक माहितीनुसार, अमोल मुळे (वय २९) याने त्यांच्यावर कोयत्याने हल्ला केल्याचे समोर आले आहे. हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाला असून त्याचा शोध घेण्यासाठी पालघर पोलिसांनी विशेष पथके तैनात केली आहेत.

ही घटना सायंकाळी सुमारे ६ ते ६.३० वाजण्याच्या दरम्यान घडली. गर्दीच्या परिसरात झालेल्या या हल्ल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून शहरात खळबळ उडाली आहे. हल्ल्याची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला.

घटनेमागे प्रेमप्रकरणातील वाद कारणीभूत असण्याची शक्यता व्यक्त केली जात असली, तरी पोलिसांकडून सर्व बाजूंनी तपास सुरू असल्याचे सांगण्यात आले. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, प्रत्यक्षदर्शींची माहिती तसेच अन्य तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपीचा माग काढण्याचे काम सुरू आहे. दरम्यान, फरार आरोपीला लवकरच अटक करण्यात येईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे. पुढील तपास पालघर पोलीस करीत आहेत.




# आजचे राशि भविष्य






**मेष :** आरोग्यविषयक प्रश्नांमुळे कदाचित तुम्हाला अशांततेचा सामना करावा लागेल. आज घरातून बाहेर जातांना मोठ्यांचा आशीर्वाद घेऊन निघा यामुळे तुम्हाला धन लाभ होऊ शकतो. पोस्टाच्या माध्यमातून आलेला संदेश संपूर्ण कुटुंबासाठी आनंदाचा दिवस असेल.



**वृषभ :** चार भिंती बाहेरील खेळांचे तुम्हाला आकर्षित करतील. ध्यानधारणा आणि योगाचा तुम्हाला फायदा होईल. आपली गुंतवणूक आणि भविष्यातील ध्येयांबद्दल गुप्तता बाळगा.



**मिथुन :** आणखी आशावादी राहण्यासाठी स्वत:ला प्रवृत्त करा. त्यामुळे तुमचा आत्मविश्वास आणि परिवर्तनशीलता, लवचिकता वाढेल, पण त्याच वेळी भीतीपोटी, चिंतेमुळे निर्माण होणाऱ्या द्वेषमूलक वैरभावाचा त्याग करा.



**कर्क :** मनावर झालेल्या आघातामुळे तुम्हाला प्रचंड धैर्य आणि शक्ती पणाला लावावी लागेल. तुमच्या सकारात्मक दृष्टिकोनामुळे तुम्ही यावर सहजपणे मात कराल. तात्पुरते कर्ज मागण्यासाठी आलेल्या लोकांकडे निव्वळ दुर्लक्ष करा.



**सिंह :** चांगल्या गोष्टी घेण्यासाठी तुमचे मन सज्ज राहील. या राशीतील काही लोकांना आज संतान पक्षाकडून आर्थिक लाभ होण्याची अपेक्षा आहे. आज तुम्हाला आपल्या मुलांवर गर्व वाटेल.




**कन्या :** तुमचा दुर्दम्य आत्मविश्वास आणि कामाची सुटसुटीत वेळ यामुळे आज दिवसभरात विश्रांती घेण्यास वेळ मिळेल. या राशीतील काही लोकांना आज संतान पक्षाकडून आर्थिक लाभ होण्याची अपेक्षा आहे. आज तुम्हाला आपल्या मुलांवर गर्व वाटेल.



**तुळ :** आजच्या दिवशी तुम्ही चैतन्याने भारले असलात तरी तुमच्याबरोबर असायला हवी अशा व्यक्तीची कमतरता तुम्हाला नक्कीच जाणवेल. तुमचे वाचवलेले धन आज तुमच्या कमी येऊ शकते परंतु या सोबतच याच्या जाण्याचे तुम्हाला दुःख ही होईल.



**वृश्चिक :** आजच्या दिवशी तुम्ही आराम करु शकाल. शरीराला तेलाने मसाज करुन तुमचे स्नायू मोकळे करा. तुमच्या माता पक्षाने आज तुम्हाला धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे.



**धनु :** देणगी आणि धर्मादाय कामामध्ये स्वत:ला गुंतवा, त्यातून तुम्हाला मन:शांती लाभेल. आर्थिक स्पात आज तुम्ही बरेच मजबूत असाल ग्रह नक्षत्रांच्या चालीने आज तुमच्यासाठी धन कमावण्यासाठी बरीच संधी मिळेल.



**मकर :** स्वत:बद्दल छान वाटावे अशा गोष्टी घडण्याचा एकदम अद्भूत दिवस. तसे तर आपला पैसा दुस?्यांना देणे कुणाला आवडत नाही परंतु, आज तुम्ही कुणी गरजूला पैसा देऊन आनंदाचा अनुभव कराल.



**कुंभ :** मित्र तुमच्या खुल्या मनाची आणि सहनशक्तीची परीक्षा पाहतील. पण तत्त्वांना शरण न जाता, विवेकी निर्णय घेण्याची खबरदारी घ्या. या राशीतील विवाहित जातकांना आज सासरच्या पक्षाकडून धन लाभ होण्याची शक्यता आहे.



**मीन :**आजचा दिवस जगून घेण्याच्या आणि करमणुकीवर अति खर्च करण्याच्या आपल्या स्वभावाचे परीक्षण करा घरगुती कामं कंटाळवाणी होतील आणि मानसिक तणावाला निमंत्रण देणारी असतील.

# हे तुम्हांला माहिती आहे का ?

दै.चालु वार्ता वृत्तसेवा

**१. मानवी शरीर**

१. आपल्या शरीरात इतकं लोह (Iron) असतं की त्यातून एक ३ इंच लांबीचं खिळ तयार होऊ शकतं.

२. डोळे बंद करून शिंकणं अपरिहार्य आहे, कारण शिंकताना मेंदूच्या स्नायूंवर ताण येतो.

३. मानवी शरीरातील सर्वात कठीण पदार्थ म्हणजे दातांचा एनॅमल (Enamel).

४. तुमच्या त्वचेच्या पेशी दर महिन्याला जवळपास एकदा पूर्णपणे नव्या होतात.

५. हृदयाचं ठोके प्रत्येक मिनिटाला ७० वेळा होतात म्हणजे दर वर्षी अंदाजे ३७ दशलक्ष वेळा.

**२. जगातील आश्चर्यकारक तथ्ये**

६. व्हेनिस (इटली) हे शहर पाण्यावर उभं आहे ११८ बेटांना जोडून बनलेलं.

७. इजिप्तमधील गिझाचा पिरॅमिड एवढा प्रचंड आहे की त्यात ३० लाख दगड वापरले गेले आहेत.

८. जपानमध्ये "Train Pushers' नावाचे कर्मचारी असतात जे गर्दीच्या वेळी लोकांना गाडीत चढवतात!

९. आइसलँडमध्ये पोलीसांकडे बंदूक नसते गुन्हेगारी दर जगात सर्वात कमी आहे.

१०. ऑस्ट्रेलियात मेंढ्या माणसांपेक्षा दहा पट जास्त आहेत.

११. मध कधी खराब होत नाही, हजारो वर्षांनंतरही खाण्यायोग्य राहतो.

**३. विज्ञान व ज्ञान**

१२. शुक्र ग्रहावर दिवस वर्षापेक्षा लांब असतो! (एक दिवस म्हणजे २४३ पृथ्वी दिवस).

१३. माणूस आपला अर्धा आयुष्यकाळ स्वप्नात घालवतो झोपेत मेंदू अजूनही सक्रिय असतो.

१४. ऑक्टोपसला तीन हृदये आणि निळं रक्त असतं.

१५. पेंग्विन पक्षी उडू शकत नाही, पण पोहण्यात तो मासळीपेक्षा वेगवान असतो.



※ टीप : वरील माहितीची दैनिक चालु वार्ता वृत्तपत्र कोणत्याही प्रकारे पुष्टी करत नाही



# पालघरमध्ये वन्यजीव संरक्षणाला नवी चालना

## वाइल्डलाईफ ॲम्ब्युलन्स-कम-रेंजर व्हेईकल'चे लोकार्पण

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**पालघर - प्रतिनिधी**
**रवि राठोड**




**पालघर :** पालघर जिल्ह्यातील वन्यजीव संरक्षण आणि संवर्धनाच्या कार्याला नवी गती देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम वाणगाव येथे साकारण्यात आला. WCAWA आणि कॅप्टन सत्यम ठाकूर यांच्या संयुक्त विद्यमाने अत्याधुनिक 'वाइल्डलाईफ ॲम्ब्युलन्स-कम-रेंजर व्हेईकल' चे लोकार्पण करण्यात आले. वन्यजीवांच्या बचाव, उपचार आणि संरक्षणासाठी हे वाहन महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

गेल्या काही वर्षांत पालघर जिल्ह्यात बिबट्यासह विविध वन्यजीवांच्या हालचालींमध्ये वाढ झाली आहे. अनेकदा जखमी, आजारी किंवा मानवी वस्तीजवळ आलेल्या वन्यजीवांच्या बचावासाठी तातडीची यंत्रणा उपलब्ध नसल्याने अडचणी निर्माण होत होत्या. या पार्श्वभूमीवर विशेष सुसज्ज वाहनाची गरज लक्षात घेऊन कॅप्टन सत्यम ठाकूर यांनी पुढाकार घेत हा उपक्रम साकारला.

आधुनिक उपकरणांनी सुसज्ज असलेले हे वाहन जखमी वन्यजीवांना तातडीने उपचार केंद्रात पोहोचविणे, बचाव मोहिमा प्रभावीपणे राबविणे तसेच वनक्षेत्रातील आपत्कालीन परिस्थितींना जलद प्रतिसाद देण्यासाठी उपयोगी ठरणार आहे. या वाहनामुळे वनविभाग, बचाव पथके आणि स्वयंसेवकांचे कार्य अधिक वेगवान आणि परिणामकारक होणार असून मानव-वन्यजीव संघर्षाच्या घटनांमध्ये नागरिकांच्या सुरक्षिततेलाही मदत मिळणार आहे.

कार्यक्रमादरम्यान वन्यजीव संवर्धन, जैवविविधतेचे महत्त्व आणि समुद्री कासव संरक्षण याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. पर्यावरण संवर्धनासाठी समाजातील प्रत्येक घटकाने सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

वन्यजीव क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. तसेच WCAWA सदस्यांना टी-शर्ट आणि प्रमाणपत्रांचे वितरण करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमास दिनेश विन्हेरकर, हार्दिक सोनी, एरिक तडवडा, पूर्वेश तांडेल, रोहन डी'क्रूझ, आचल मनियार, भावेश बाबरे, विशाल राऊत, अविनाश महाडिक, रेमंड डी'सूझा आणि पार्थ कंसारा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

स्थानिक नागरिक, पर्यावरणप्रेमी, वन्यजीव अभ्यासक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पालघर जिल्ह्यातील वन्यजीव संरक्षण चळवळीला नवी दिशा देणारा हा उपक्रम भविष्यात वन्यजीव संरक्षण व्यवस्थेसाठी महत्त्वाचा टप्पा ठरेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

# दहिफळ खंदारे येथे सोयाबीन व तूर बियाण्याची उगवण क्षमता तपासणीचे प्रात्यक्षिक

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**मंठा - प्रतिनिधी**
**सुरेश ज्ञा. दवणे**



**जालना (मंठा) :** दि.१२ जून २०२६ रोजी तालुक्यातील दहिफळ खंदारे येथे रयत शेतकरी गट, कृषी विभाग आणि पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सोयाबीन व तूर बियाण्याच्या उगवण क्षमता तपासणीचे प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले. या उपक्रमात गटाचे सर्व सदस्य उपस्थित राहून इर्जीक पद्धतीने बियाण्यांची तपासणी करण्यात आली.

प्रात्यक्षिकादरम्यान सर्वप्रथम गोणपाट ओला करून त्यावर १०० बियाणे ठेवण्यात आली. त्यानंतर त्यावर पुन्हा ओले गोणपाट ठेवून त्याची गुंडाळणी करण्यात आली. ही गुंडाळणी दोन ठिकाणी सुतळीच्या साहाय्याने बांधून त्यावर संबंधित गट सदस्याचे ओळखपत्र (आयकार्ड) लावण्यात आले. त्यानंतर ही गुंडाळी पाच ते सहा दिवस सावलीच्या ठिकाणी ठेवण्यात आली. यावेळी गटाचे अध्यक्ष राठोड यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, बियाण्याची उगवण क्षमता ७० ते ७५ टक्क्यांपेक्षा जास्त असल्यास ते बियाणे पेरणीस योग्य समजले जाते. मात्र, उगवण क्षमता ७० टक्क्यांपेक्षा कमी असल्यास अशा बियाण्यांची पेरणीसाठी निवड करू नये. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीपूर्वी बियाण्यांची उगवण क्षमता तपासून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

या कार्यक्रमास मंडळ कृषी अधिकारी गोविंद नवघरे, पाणी फाउंडेशनचे फिल्ड ऑफिसर बाळासाहेब चव्हाण, महादेव निपाणी, गटाचे निमंत्रक पवन खंदारे तसेच चेतन जाधव, गजानन फुफाटे, वैभव देशमुख, समाधान देशमुख, गौतम दाहिजे, विजय जाधव, गोविंद सानप, प्रकाश दाहिजे, विकी चव्हाण, कृष्णा कोकाटे, शंकर कोकाटे, भारत राठोड यांच्यासह अन्य सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. पेरणीपूर्वी बियाण्यांची उगवण क्षमता तपासल्यास शेतकऱ्यांना अपेक्षित रोपसंख्या मिळण्यास मदत होते व उत्पादन वाढीसाठी त्याचा लाभ होतो, असा संदेश या प्रात्यक्षिकातून देण्यात आला.

# ग्रुप ग्रामपंचायत दळे मध्ये महिलाराज

## सद्स्य आरक्षनात महिलांचीच बाजी

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**रत्नागिरी - प्रतिनिधी**
**समिर शिरवडकर**




**राजापूर (दळे) :** महाराष्ट्रामधील मुदत संपलेल्या,आणि प्रशासन राज असणाऱ्या ग्रामपंचायतींचे आज १२ जून रोजी सदस्य आरक्षण सोडत महसूल विभाग अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यांत आली. यात ग्रामपंचायत दळे ची सद्स्य संख्या ९ असून लोकनियुक्त सरपंच अशी आहे,तर लोकनियुक्त सरपंच आरक्षण या आधी झाली असून, ती देखील सर्वसाधारण महिला असून, त्यात सदस्य सुद्धा प्रत्येक प्रभागात महिलाच असल्यानें ग्रामपंचायत दळेचे सर्व सूत्रे महिलाकडे आल्याचे दळेत महिलाराज असे म्हटले तर वावगं ठरणार नाही.या सोडती मध्ये प्रामुख्याने प्रभाग क्र.१-तुळसुंदे (मावळतीवाडी) अनुक्रमे सर्वसाधारण महिला -२, आणि सर्वसाधारण (ओपन)-१, प्रभाग क्र. होळी,मठ -नागरिकांचा मागास प्रवर्ग -१,सर्वसाधारण महिला-१,आणि सर्वसाधारण -१,तसेच प्रभाग क्र.३-दळे,वाडा वाघरण-नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला-१,सर्वसाधारण महिला-१,आणि सर्वसाधारण -१. अश्या प्रकारे आरक्षण घोषित झाले असुन सर्वच ठिकाणी महिलाराज असल्याने पुरुषांचा चांगलाच हिरमोड झालेला आहे.

# कोरेगाव भिमा सोसायटीच्या चेअरमनपदी बाळासाहेब वाडेकर..!

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**वाघोली - प्रतिनिधी**
**स्वरुप गिरमकर**



**(पुणे) वाघोली :** कोरेगाव भिमा (ता.शिरूर) विविध कार्यकारी विकास सहकारी सोसायटी कोरेगाव भिमा क्रमांक दोनच्या चेअरमनपदी बाळासाहेब दत्तात्रय वाडेकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. तत्कालीन चेअरमन महादेव सोपान फडतरे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर ही निवड झाली. या निवडीमुळे वाडा गावठाण परिसराला इतिहासात पहिल्यांदाच चेअरमन पदाची संधी मिळाली असून, परिसरात मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.

या निवडणुकीच्या निमित्ताने कोरेगाव भिमाच्या सहकार क्षेत्रात मैत्री आणि त्यागाचा एक आगळावेगळा आदर्श समोर आला आहे. संचालक अशोक देवचंद नाबगे यांना चेअरमन पदाची थेट संधी उपलब्ध असताना, त्यांनी आपल्या खास मित्रासाठी स्वतःची संधी बाजूला ठेवली व बाळासाहेब वाडेकर यांच्या नावाचा मार्ग मोकळा केला. त्यांच्या या 'यारी'ची आणि राजकीय सुसंस्कृतपणाची सध्या तालुक्यात जोरदार चर्चा सुरू आहे. या निवडीनंतर नवनिर्वाचित चेअरमन वाडेकर यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. या प्रसंगी माजी सरपंच आबासाहेब लक्ष्मण गव्हाणे, माजी पंचायत समिती सदस्य पंढरीनाथ गव्हाणे, वसंत गिलबिले, आणि माजी चेअरमन मधुकर शामराव गव्हाणे यांनी उपस्थित राहून नूतन पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी मारुती सावंत, कांताराम कडलक, संतोष बगाटे, विकास कोळेकर, आकाश नाबगे, रामदास नायकुडे, गोविंद वाडेकर, गणेश वाडेकर, संपत माळी, नवनाथ माळी, सुरेश कोकरे, बाळासाहेब सावंत, ज्ञानेश्वर नायकुडे यांच्यासह सोसायटीचे सर्व विद्यमान संचालक, माजी चेअरमन आणि माजी व्हाईस चेअरमन उपस्थित होते. सदर निवडणूक प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून प्रशांत पिसाळ यांनी पाहिली, तर त्यांना सोसायटीचे सचिव मधुकर कंद यांनी सहकार्य केले.

# दोषींना वाचवण्यासाठी शीतल बुलबुले यांची 'पळवाट'?

## विस्तार अधिकाऱ्यांना दिसलेला १२.७५ लाखांचा अपहार सहाय्यक बीडीओ यांना 'शून्य' कसा वाटला?

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**पाटस - प्रतिनिधी**
**गणेश गावडे**



**दौंड/पुणे :** दौंड तालुक्यातील आलेगाव ग्रामपंचायत अंतर्गत आरओ फिल्टरच्या माध्यमातून जमा होणाऱ्या निधीच्या कथित अपहार प्रकरणाला आता अत्यंत संशयास्पद वळण आले असून, या प्रकरणात दौंड पंचायत समितीच्या सहाय्यक गटविकास अधिकारी शीतल बुलबुले यांची भूमिका संशयाच्या मुख्य भोवऱ्यात सापडली आहे. एका जबाबदार विस्तार अधिकाऱ्याने सखोल चौकशी करून पुराव्यांसह सिद्ध केलेला १२ लाख ७५ हजार ९०० रुपयांचा अपहार, सहाय्यक बीडीओ शीतल बुलबुले यांनी थेट नाकारल्याने हा शासकीय निधीचा अपहार दडपण्याचा आणि दोषींना वाचवण्याचा शासकीय प्रयत्न आहे का, असा थेट आणि गंभीर सवाल आता तालुक्यातून उपस्थित केला जात आहे. आलेगाव येथील महादेव बाळासाहेब इंगवले यांनी १२ जून २०२४ रोजी दौंड पंचायत समिती तसेच पुणे जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार अर्ज सादर करून ग्रामपंचायत अंतर्गत आरओ फिल्टरमधून जमा होणाऱ्या निधीच्या अपहाराची चौकशी करण्याची मागणी केली होती. या तक्रारीची दखल घेत दौंड पंचायत समितीचे विस्तार अधिकारी एल. एन. जंजिरे यांनी प्रकरणाची सखोल चौकशी केली आणि ७ सप्टेंबर २०२४ रोजी आपला चौकशी अहवाल सादर केला. या अहवालात त्यांनी स्पष्टपणे नमूद केले होते की, तपासणीदरम्यान आरओ फिल्टरमधून ग्रामपंचायतीला मिळणारे अपेक्षित उत्पन्न नियमबाह्य पद्धतीने गोळा करून त्याची विल्हेवाट लावण्यात आली आहे. हा प्रकार अत्यंत गंभीर असून यामुळे ग्रामपंचायतीचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे, असा निष्कर्ष मांडत विस्तार अधिकाऱ्यांनी एकूण १२ लाख ७५ हजार ९०० रुपयांचा अपहार झाल्याचे स्पष्ट केले होते. तसेच संबंधित ग्रामसेवक आणि सरपंच यांना या प्रकरणाला थेट जबाबदार धरून त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्याची शिफारस या अहवालात करण्यात आली होती. मात्र, हा अहवाल आल्यानंतर कारवाई करणे अपेक्षित असताना चक्रे उलटी फिरली आणि हा अहवाल आल्यानंतर काही काळ हे प्रकरण थंड बस्त्यात पडले. दरम्यान, तक्रारदार इंगवले यांनी सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवल्याने या प्रकरणाची फेरचौकशी करण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार फेरचौकशीची जबाबदारी दौंड पंचायत समितीच्या सहाय्यक गटविकास अधिकारी शीतल बुलबुले यांच्याकडे सोपवण्यात आली. मात्र, शीतल बुलबुले यांनी मूळ चौकशीतील सर्व पुरावे आणि निष्कर्ष बाजूला सारत दोषींना थेट क्लिनचीट देण्याचा पराक्रम केला. शीतल बुलबुले यांनी सादर केलेल्या फेरचौकशीच्या अभिप्रायात प्रस्तुत प्रकरणात कोणताही अपहार झालेला नाही आणि दोषपत्र तयार करून कारवाई करण्याची गरज नाही, असे मत नोंदवून प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला. शीतल बुलबुले यांच्या या भूमिकेमुळे संपूर्ण दौंड तालुक्यात प्रशासकीय यंत्रणेची थट्टा उडाली असून, वरिष्ठ विस्तार अधिकाऱ्यांनी कागदोपत्री शोधलेला १२.७५ लाखांचा अपहार शीतल बुलबुले यांना अचानक शून्य कसा वाटला, मूळ अहवालातील भ्रष्टाचाराचे सबळ पुरावे शीतल बुलबुले यांनी कोणत्या निकषांवर फेटाळले आणि हा फेरचौकशीचा अहवाल म्हणजे दोषी ग्रामसेवक आणि सरपंचांना वाचवण्यासाठी तयार करण्यात आलेले प्रायोजित प्रमाणपत्र आहे का, असे गंभीर प्रश्न नागरिक विचारत आहेत. दौंड पंचायत समितीमध्ये यापूर्वीही डस्टबिन घोटाळा प्रकरण अशाच प्रकारे चौकशीच्या नावाखाली आणि अर्थपूर्ण तडजोडी करून दडपण्यात आले होते, अशी चर्चा आजही तालुक्यात सुरू आहे. तोच कित्ता आता आलेगाव आरओ फिल्टर प्रकरणात गिरवला जात असून, या संपूर्ण दडपशाहीच्या केंद्रस्थानी सहाय्यक बीडीओ शीतल बुलबुले असल्याचे चित्र दिसत आहे. एका बाजूला नवनियुक्त गटविकास अधिकारी कारभारात पारदर्शकता आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत असताना, दुसऱ्या बाजूला सहाय्यक बीडीओ शीतल बुलबुले यांच्या अशा संशयास्पद क्लिनचीटमुळे संपूर्ण पंचायत समितीच्या चौकशी व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. दौंड पंचायत समितीच्या अंतर्गत अधिकाऱ्यांकडूनच भ्रष्टाचाराच्या प्रकरणांवर पांघरूण घालण्याचे काम सुरू असल्याने, आता तक्रारदार आणि आलेगावच्या ग्रामस्थांचा स्थानिक चौकशी यंत्रणेवरचा विश्वास पूर्णपणे उडाला आहे. एका अधिकाऱ्याला अपहार दिसतो आणि त्याच्या वरच्या पदावरील महिला अधिकाऱ्याला तो दिसत नाही, यातच मोठी गोम असल्याने आता पुणे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची त्रयस्थ यंत्रणेमार्फत चौकशी करावी आणि भ्रष्टाचाराला पाठीशी घालणाऱ्या सहाय्यक गटविकास अधिकारी शीतल बुलबुले यांच्या संशयास्पद अहवालाची आणि भूमिकेचीही सखोल चौकशी करावी, अशी आक्रमक मागणी आता तक्रारदार आणि नागरिकांकडून केली जात आहे.

# एमआरपी व्यवस्थेत सुधारणा करा

## ग्राहकांच्या आर्थिक शोषणाला आळा घाला

### अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे केंद्र सरकारकडे निवेदन; २५ जून रोजी जंतर-मंतर येथे राष्ट्रीय आंदोलन




**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**गंगाखेड - प्रतिनिधी**
**प्रेम सावंत**

**गंगाखेड :** बाजारात लागू असलेल्या एमआरपी (कमाल किरकोळ विक्री मूल्य) व्यवस्थेमुळे ग्राहकांचे संरक्षण होण्याऐवजी अनेक ठिकाणी आर्थिक शोषण होत असल्याचा गंभीर आरोप अखिल भारतीय ग्राहक पंचायतने केला असून, या व्यवस्थेत तातडीने कायदेशीर सुधारणा करण्याची मागणी केंद्र सरकारकडे केली आहे. यासंदर्भात पंतप्रधान, केंद्रीय वित्त मंत्री तसेच ग्राहक व्यवहार मंत्र्यांना उपविभागीय अधिकारी गंगाखेड यांच्या मार्फत निवेदन सादर करण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, एमआरपी प्रणाली लागू करण्यामागील मूळ उद्देश ग्राहकांना एकसमान व पारदर्शक किंमत उपलब्ध करून देणे हा होता. मात्र सध्या अनेक उत्पादक कंपन्या कोणतीही स्पष्ट कायदेशीर मर्यादा नसताना वस्तूंवर मनमानी पद्धतीने अत्यंत जास्त एमआरपी छापत आहेत. त्यानंतर मोठ्या सवलतींचे आमिष दाखवून ग्राहकांची दिशाभूल केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

विशेषतः औषधे, सौंदर्यप्रसाधने आणि दैनंदिन वापराच्या वस्तूंमध्ये उत्पादन खर्चाच्या तुलनेत अनेक पटीने जास्त एमआरपी आकारली जात असल्याने ग्राहकांची आर्थिक फसवणूक होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ग्राहकांना वस्तूंचा वास्तविक उत्पादन खर्च माहीत नसल्यामुळे योग्य किंमतीचा अंदाज घेणे अशक्य होत असल्याचेही सांगण्यात आले.

अखिल भारतीय ग्राहक पंचायतने प्रत्येक उत्पादनावर एमआरपीसोबत उत्पादन खर्च छापणे बंधनकारक करावे, मनमानी एमआरपीवर कठोर कायदेशीर निर्बंध आणावेत तसेच 'उचित व न्याय्य कमाल मूल्य' निश्चित करण्यासाठी स्वतंत्र कायदेशीर प्राधिकरण स्थापन करावे, अशी मागणी केली आहे. या प्राधिकरणाला एमआरपीची तपासणी, पुनरावलोकन आणि नियमभंग करणाऱ्यांवर कारवाईचे अधिकार देण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय औषधे, खाद्यपदार्थ आणि जीवनावश्यक वस्तूंवर विशेष नियंत्रण यंत्रणा लागू करून ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या उत्पादक व विक्रेत्यांवर कठोर दंडात्मक कारवाईची तरतूद करण्याची मागणी करण्यात आली आहे. या विषयावर संसद व विधानसभांमध्ये तातडीने चर्चा करून आवश्यक कायदेशीर दुरुस्त्या कराव्यात, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, या मागण्यांसाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायत देशभर जनजागृती मोहीम, निवेदने, पत्रकार परिषद आणि सोशल मीडिया अभियान राबवत असून, २५ जून २०२६ रोजी दिल्लीतील जंतर-मंतर येथे राष्ट्रीय स्तरावरील जनआंदोलनाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.



# तळेगाव दाभाडे शहर पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी दैनिक प्रभातचे पत्रकार मनोहर नथुराम दाभाडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली



**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**तळेगाव दाभाडे - प्रतिनिधी**

**तळेगाव दाभाडे :** तळेगाव दाभाडे येथील साप्ताहिक अंबर या कार्यालयात झालेल्या विशेष सभेत निवड करण्यात आली. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून संघाचे संस्थापक, ज्येष्ठ पत्रकार सुरेश साखवळकर त्यांनी काम पाहिले. यावेळी उपाध्यक्षपदी शैलजा फुलकर, सचिवपदी प्रभाकर तुमकर,खजिनदारपदी राजेश बारणे, अंतर्गत हिशोब तपासणीस सोनबा गोपाळे, प्रकल्प प्रमुख बी.एम.भसे तसेच कार्यकारणी सदस्यपदी रामदास वाडेकर, श्रीकांत चेपे यांची निवड करण्यात आली.

नवनिर्वाचित दाभाडे यांनी यापूर्वी तळेगाव दाभाडे नगर परिषदेचे शिक्षण मंडळाचे सभापती पद, बजाज ऑटो कामगार सोसायटीचे सेक्रेटरी पद, सरसेनापती उमाबाई दाभाडे पतसंस्थेचे संस्थापक संचालक पद, महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांचे कडून गुणवंत कामगार पदासह अनेक सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रामध्ये कार्य केलेले आहे.

या सभेसाठी निवड झालेल्या सदस्यासह तात्यासाहेब धांडे, राजेंद्र जगताप आदी सदस्य उपस्थित होते, निवडीनंतर श्री दाभाडे व नवनियुक्त कार्यकारिणीचे सर्वांनी कौतुक करून शुभेच्छा व्यक्त केल्या. सभेचे कामकाज सचिव प्रभाकर तुमकर यांनी पाहिले.

# पुणे शहरात जड, अवजड वाहनांना प्रवेशबंदी

## - वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश
## - १५ जून रात्री १२ ते २४ जून रात्री १२ वाजेपर्यंत असणार प्रवेश बंदी
## - शहराबाहेरील पर्यायी मार्गांचा वापर बंधनकारक

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**वाघोली - प्रतिनिधी**
**स्वरुप गिरमकर**

**(पुणे) वाघोली :** पुणे शहरातील वाढती वाहतूक कोंडी, अपघातांचे प्रमाण आणि नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेऊन पुणे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी जड व अवजड वाहनांच्या शहरातील प्रवेशावर निर्बंध घालण्याचे आदेश जारी केले आहेत. १५ जून रात्री १२ वाजेपासून हे आदेश लागू होणार असून शहरातून जाणाऱ्या ट्रक, कंटेनर, ट्रेलर आणि इतर मालवाहू वाहनांना पर्यायी मार्गांचा वापर करावा लागणार आहे.

पुणे शहरात सोलापूर, अहिल्यानगर, नाशिक, मुंबई आणि सातारा या मार्गांनी ये-जा करणाऱ्या वाहनांमुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. विशेषतः खेड-शिवापूर, कात्रज, नवले पूल, वाघोली, चाकण, मंचर, शिक्रापूर, नारायणगाव, खराडी, हडपसर, मांजरी, लोणी काळभोर आणि मुंढवा परिसरात दररोज वाहतुकीचा ताण वाढत आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार, शहरातून केवळ मार्गक्रमण करणाऱ्या जड व अवजड वाहनांनी आता शहरातील अंतर्गत रस्त्यांचा वापर न करता निश्चित करण्यात आलेल्या पर्यायी मार्गांचा अवलंब करणे आवश्यक राहणार आहे. सोलापूरकडून मुंबईकडे जाणारी वाहने तसेच मुंबईकडून सोलापूर, अहिल्यानगर आणि इतर भागांकडे जाणारी मालवाहतूक वाहने शहराबाहेरील मार्गांचा वापर करतील. प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, अत्यावश्यक सेवा, जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा आणि शहरातील स्थानिक गरजांसाठी येणाऱ्या वाहनांना आवश्यकतेनुसार सवलत देण्यात येणार आहे. मात्र केवळ शहरातून मार्गक्रमण करणाऱ्या जड वाहनांवर ही प्रवेशबंदी लागू राहील.



या निर्णयामुळे पुणे शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास, अपघातांमध्ये घट होण्यास तसेच नागरिकांच्या प्रवासाचा वेळ वाचण्यास मदत होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. १५ जून पासून आदेशांची कठोर अंमलबजावणी करण्यात येणार असून नियमभंग करणाऱ्यांवर वाहनांवर कडक कारवाई केली जाणार आहे. ज्या वाहनांना पुणे शहरामध्ये येणे आवश्यक आहे. उदा.- शहरात येवून शहरामध्ये माल उतरवून किंवा माल उतरवून झाल्यानंतर पुणे शहरात माल भरून इतर शहरात जाणाऱ्या वाहनांनी तसेच आवश्यक सेवा पुरविणाऱ्या वाहनांनी ७२ तास अगोदर वाहतूक शाखा पुणे शहर यांची परवानगी घेऊन रात्री ११ ते सकाळी ६.०० वाजे दरम्यान दिलेल्या पर्यायी मार्गाचा वापर करावा. अत्यावश्यक सेवेतील वाहने (पेट्रोल, डिझेल, दूध, शेतोमाल इ.) यांना बंदी आदेश लागू राहणार नाहीत.

जाणे व येण्यासाठी पर्यायी मार्ग :

**सोलापूर कडून मुंबईकडे जाणारी वाहने :**

१) केडगाव चौफुला-न्हावरे-तळेगाव ढमढेरे-शिक्रापूर-चाकण मार्ग २) उरळी कांचन-कोरेगाव मूळ-आष्टापूर-तळेगाव ढमढेरे-शिक्रापूर-चाकण मार्ग ३) थेऊर फाटा-केसनंद-लोणीकंद-तुळापूर फाटा-आळंदी मार्ग

**मुंबई येथून सोलापूर कडे जाणारी वाहने :**

१) तळेगाव दाभाडे-चाकण-शिक्रापूर-तळेगाव ढमढेरे-न्हावरे-केडगाव चौफुला सोलापूर हायवे मार्ग २) तळेगाव दाभाडे-चाकण-शिक्रापूर-तळेगाव ढमढेरे-आष्टापूर-कोरेगाव मूळ-उरळी कांचन मार्ग ३) कात्रज-मंतरवाडी फाटा-वडकी-दिवेघाट-सासवड-जेजुरी-मोरगाव-सुपे-केडगाव चौफुला मार्ग

**मुंबई येथून अहिल्यानगर जाणारी वाहने :**

१) तळेगाव, चाकण, खेड, मंचर, नारायणगाव, आळेफाटा, अहिल्यानगर २) नाशिक फाटा-भोसरी-चाकण-शिक्रापूर-शिरूर

**अहिल्यानगर येथून मुंबई कडे जाणारी वाहने :**

शिक्रापूर-चाकण-तळेगाव मार्गे मुंबई

सासवड येथून सोलापूर कडे जाणारी वाहने : सासवड-जेजुरी-मोरगाव-सुपे-केडगाव चौफुला मार्ग

**इच्छित स्थळी जाण्यासाठी पर्यायी मार्ग :**

१. अहिल्यानगर कडून पुणे शहरात - नगर रोडने-वाघोली-खराडी बायपास-शास्त्रीनगर चौक-गोल्फ क्लब चौक-आळंदी रोड जंक्शन चंद्रमा चौक-पोलीस चौकी-हरीश ब्रिज मार्गे इच्छित स्थळी जातील

२. सोलापूर रोडकडून पुणे शहरात - मगरपट्टा-भैरवनाला-लुल्लानगर चौक-गंगाधाम चौक-मार्केट यार्ड मार्ग

३. सातारा सांगली कोल्हापूर - बंगळूर हायवे मार्गे नवले ब्रिज, कात्रज चौक, मार्केट यार्ड

४. मुंबई/नाशिक कडून पुणे शहरात - हॅरिस ब्रिज-बोपोडी-चंद्रमा-गोल्फ चौक-खराडी बायपास

# युवक काँग्रेसचा पिंपरी-चिंचवडमधील शाळांच्या खाजगीकरणाला तीव्र विरोध

## महापौरांना निवेदन देत आमरण उपोषणाचा इशारा

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**पिंपरी चिंचवड - प्रतिनिधी**

**पिंपरी :** महाराष्ट्र प्रदेश व पिंपरी चिंचवड शहर युवक काँग्रेसच्या वतीने आज पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवी लांडगे तसेच अतिरिक्त आयुक्त विक्रांत बागडे यांची भेट घेऊन महानगरपालिकेच्या शाळा आणि शैक्षणिक आरक्षण असलेल्या जमिनी खाजगी संस्थांच्या ताब्यात देण्याच्या निर्णयाला तीव्र विरोध नोंदविण्यात आला. यावेळी युवक काँग्रेसचे ॲड.उमेश खंदारे यांच्या नेतृत्वाखाली दोघांना निवेदन सादर करण्यात आले. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सहा शाळा 'आकांक्षा फाउंडेशन' या खाजगी संस्थेकडे चालविण्यास देण्याची प्रक्रिया तसेच पुनावळे येथील सर्व्हे क्रमांक ३८ व ४४ मधील शाळेसाठी आरक्षित असलेली जमीन East Oxford International Foundation या खाजगी संस्थेला भाडेतत्त्वावर देण्याचा निर्णय हा सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेच्या मूलभूत तत्त्वांना छेद देणारा असल्याचे युवक काँग्रेसने नमूद केले. युवक काँग्रेसच्या शिष्टमंडळाने महापौर व अतिरिक्त आयुक्त यांना निदर्शनास आणून दिले की, भारतीय राज्यघटनेच्या कलम १४ नुसार प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार (Right to Equality) प्रदान करण्यात आला आहे, तर कलम २१-अ अंतर्गत शिक्षणाचा अधिकार (Right to Education) हा प्रत्येक बालकाचा मूलभूत हक्क म्हणून मान्य करण्यात आला आहे. महानगरपालिकेच्या शाळांमध्ये प्रामुख्याने आर्थिकदृष्ट्या दुर्बल, कामगार, कष्टकरी व वंचित घटकांतील विद्यार्थी शिक्षण घेतात. अशा शाळांचे व्यवस्थापन खाजगी संस्थांकडे सोपवून निवडक विद्यार्थ्यांसाठी वेगळी शिक्षण व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न हा विद्यार्थ्यांमध्ये भेदभाव निर्माण करणारा असून समान शिक्षणाच्या घटनात्मक तत्वांनाच बाधा पोहोचवणारा आहे. महानगरपालिकेने स्वतःच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्याऐवजी शिक्षण व्यवस्थेचे खाजगीकरण करण्याचा मार्ग स्वीकारणे हे सामाजिक न्याय, समान संधी आणि सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेच्या मूलभूत उद्दिष्टांच्या विरोधात असल्याची भूमिका युवक काँग्रेसने यावेळी मांडली. तसेच संबंधित निविदा प्रक्रियेमध्ये पारदर्शकतेचा अभाव असल्याची शंका व्यक्त करत युवक काँग्रेसने संपूर्ण प्रक्रिया तात्काळ स्थगित करून तिची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी केली. शैक्षणिक आरक्षण असलेल्या जमिनी कोणत्याही खाजगी संस्थेला देण्याचा निर्णय रद्द करण्यात यावा, तसेच महानगरपालिकेच्या शाळांचे व्यवस्थापन खाजगी संस्थांकडे सोपविण्याचा निर्णय मागे घेण्यात यावा, अशी ठाम भूमिका यावेळी मांडण्यात आली. विद्यार्थ्यांच्या हिताच्या विरोधात जाणारे हे निर्णय तात्काळ मागे घेतले नाहीत, तर महाराष्ट्र प्रदेश व पिंपरी चिंचवड शहर युवक काँग्रेसच्या वतीने व्यापक लोकआंदोलन तसेच विद्यार्थ्यांच्या शिक्षण हक्कासाठी आणि सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेच्या संरक्षणासाठी आमरण उपोषणासह तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा युवक काँग्रेसच्या प्रतिनिधींनी प्रशासनाला दिला. यावेळी प्रदेश युवक काँग्रेसचे ॲड.उमेश खंदारे यांच्यासह पिंपरी चिंचवड शहर एन एस यु आय चे अध्यक्ष सौरभ शिंदे, शहर युवक काँग्रेसचे करण गिल, मयूर रोकडे, जय ठोंबरे, संकेत सरोदे, सयान अन्सारी आदी उपस्थित होते.



**प्रतिक्रिया :**
चांगल्या शैक्षणिक सुविधांच्या नावाखाली महानगरपालिकेच्या शाळा व त्यांचे भूखंड खाजगी संस्थांना देऊन शिक्षणाचे होणारे बाजारीकरण व खाजगीकरण थांबवून शहरातील विद्यार्थ्यांचे हित, पालकांच्या भावना आणि सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेचे संरक्षण यासाठी युवक काँग्रेस शेवटपर्यंत संघर्ष करत करीत राहील.
- ॲड.उमेश राम खंदारे, सचिव, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस

# संघर्ष, जिद्द आणि परिश्रमांची यशोगाथा!

## खोंदला गावच्या लेकीची पोलिस उपनिरीक्षक पदावर भरारी; ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी ठरली प्रेरणास्थान

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**धाराशिव - प्रतिनिधी**
**समीर मुल्ला**

**धाराशिव :** 'परिस्थिती कितीही कठीण असली तरी जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिक परिश्रम यांच्या जोरावर यश मिळवता येते,' याचे जिवंत उदाहरण म्हणजे खोंदला गावची कन्या प्रज्ञा उद्धव पाडुळे. अत्यंत हालाखीच्या आर्थिक परिस्थितीतून शिक्षण घेत, अनेक संकटांवर मात करत त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) स्पर्धा परीक्षेत यश संपादन केले असून त्यांची पोलीस उपनिरीक्षक पदावर निवड होऊन मुंबई शहरात नियुक्ती झाली आहे.

प्रज्ञा यांच्या यशामुळे संपूर्ण खोंदला गावासह कळंब तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, ग्रामीण भागातील युवक-युवतींसाठी त्या प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व ठरल्या आहेत.

**शिक्षणाची सुरुवात गावातूनच**

प्रज्ञा यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खोंदला येथे झाले. त्यानंतर त्यांनी शरदचंद्रजी पवार विद्यालय, खोंदला येथे माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. पुढे ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब येथे उच्च माध्यमिक शिक्षण घेतले. शिक्षणाच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांनी मेहनत, शिस्त आणि सातत्य कायम ठेवले. स्पर्धा परीक्षांचे स्वप्न उराशी बाळगत त्यांनी पुणे येथील ज्ञानदीप अकॅडमीमध्ये प्रवेश घेतला आणि MPSC परीक्षेची तयारी सुरूकेली. मात्र हा प्रवास सहज नव्हता. आर्थिक अडचणी, स्पर्धेचा ताण आणि ग्रामीण भागातील मर्यादित साधनसामग्री अशा अनेक अडथळ्यांवर मात करत त्यांनी अभ्यास सुरू ठेवला.

**आर्थिक परिस्थिती होती अत्यंत कठीण**

प्रज्ञा यांच्या कुटुंबाकडे एक गुंठादेखील शेती नाही. घरची परिस्थिती अत्यंत साधी आणि संघर्षमय आहे. वडील कष्ट करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात, तर आई बांगड्यांचा व्यवसाय करून संसाराला हातभार लावते. अनेकदा आर्थिक अडचणींमुळे स्वप्नांना मर्यादा येतात; मात्र प्रज्ञा यांनी परिस्थितीला कधीही शरण न जाता तिच्याशी संघर्ष केला.

घरातील प्रत्येक सदस्याने त्यांच्या शिक्षणासाठी आणि स्वप्नासाठी केलेल्या त्यागाचे फळ आज संपूर्ण कुटुंबाला मिळाले आहे. गरीब कुटुंबातील मुलगी आज महाराष्ट्र पोलीस दलात अधिकारी म्हणून रुजू होणार असल्याने गावकऱ्यांमध्ये अभिमानाची भावना निर्माण झाली आहे.



**मेहनतीचे फळ अखेर मिळाले**

MPSC परीक्षेची तयारी करताना अनेक अपयश, अडचणी आणि आव्हाने त्यांच्या समोर उभी राहिली. मात्र त्यांनी संयम न सोडता सातत्याने अभ्यास सुरूठेवला. 'यश मिळेपर्यंत थांबायचे नाही' हा निर्धार त्यांनी कायम ठेवला आणि अखेर पोलिस उपनिरीक्षक पद मिळवून स्वतःचे तसेच कुटुंबाचे स्वप्न पूर्ण केले.

**ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी संदेश**

आज ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी आर्थिक अडचणी, अपुरी साधने आणि मार्गदर्शनाच्या अभावामुळे खचून जातात. अशा विद्यार्थ्यांसाठी प्रज्ञा पाडुळे यांची यशोगाथा आशेचा किरण ठरत आहे. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी ध्येय स्पष्ट असेल आणि त्यासाठी मेहनत घेण्याची तयारी असेल तर यश निश्चित मिळते, हे त्यांनी दाखवून दिले आहे.

**गावाचा अभिमान**

खोंदला गावातील एका सामान्य कुटुंबातील मुलगी आज पोलिस उपनिरीक्षक बनून मुंबई शहरात सेवा देणार आहे. त्यामुळे संपूर्ण गावाला तिचा अभिमान वाटत आहे. गावकऱ्यांकडून, शिक्षकांकडून, मित्रपरिवाराकडून आणि विविध सामाजिक स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

प्रज्ञा पाडुळे यांचे हे यश केवळ वैयक्तिक नसून संपूर्ण ग्रामीण समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या यशामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत नवी स्वप्ने निर्माण झाली आहेत. 'परिस्थिती नव्हे, तर जिद्द माणसाला मोठे बनवते' याची साक्ष म्हणजे पोलिस उपनिरीक्षक प्रज्ञा उद्धव पाडुळे!

# माजी आमदार राजेश पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदानाचा महायज्ञ

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**चंदगड - प्रतिनिधी**
**संदिप कांबळे**

**चंदगड :** चंदगड विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार तथा जनतेचे लाडके नेते राजेश पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रविवार, दि. १४ जून २०२६ रोजी हलकर्णी फाटा येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून वाढदिवस साजरा करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. एका रक्तदात्यामुळे अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळू शकते. याच सामाजिक जाणीवेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि.




## १४ जूनला हलकर्णी फाटा येथे भव्य शिबिर

१४ जून रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत हलकर्णी फाटा येथे हे शिबिर पार पडणार असून कार्यकर्ते, पदाधिकारी, युवक-युवती तसेच सर्वसामान्य नागरिकांनी रक्तदान करून या उपक्रमात सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. 'रक्तदान हेच श्रेष्ठ दान' हा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात सहभागी होऊन सामाजिक बांधिलकी जपावी आणि गरजूंसाठी मदतीचा हात द्यावा, असेही आयोजकांनी म्हटले आहे. 'चला रक्तदान करूया... जीवनदान देऊया!' या संदेशासह हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# संघर्षमय जीवनातून मार्ग काढायचा असेल तर संत संगती आवश्यक... भागवताचार्य बा.ल. चौदावे

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**उमरी - प्रतिनिधी**
**श्रीनिवास मुक्कावार**

**उमरी :** जीवनात खूप संघर्ष निर्माण झाला मानवी जीवन अस्थिर होते. संघर्षमय जीवनातून मार्ग काढायचा असेल तर संत संगती आवश्यक असल्याचे प्रतिपादन भागवताचार्य बा.ल. चोथवे यांनी केले आहे. उमरी तालुक्यातील श्रीक्षेत्र गोरठा येथील संतकवी दासगणु महाराज प्रतिष्ठानात अधिकमासानिमित्त आयोजित केलेल्या प्रवचनातून ते बोलत होते.

हभप बा.ल.चोथवे महाराज पुढे म्हणाले. चांगले काम करित असलेल्याना खूप त्रास सहन करावा लागतो. जीवनात संघर्ष करावा लागतो. परंतू घाबरू नका



संत संगती करा, चांगले विचार आत्मसात करा, संत चरित्राचा अभ्यास करा, भगवंतावर नितांत श्रध्दा ठेवा जीवन सुखी राहील. संत संगतीचे फायदे सांगतांना श्री चोथवे महाराज म्हणाले संत संगती बुद्धीचा जडपणा कमी करते, वाणीच्या ठिकाणी, सत्य व कोमलतेचा वर्षाव करते, पापबुद्धीचा नाश व चित्ताची प्रसन्नता हे संत संगतीचे सर्वात मोठे फळ होय.असे ही त्यांनी सांगितले आहे.


एक पाऊल सत्याच्या शोधात!
साथ तुमची! काम आमचं!
दैनिक चालु वार्ता
ह्या वृतपत्रासाठी संपुर्ण महाराष्ट्रात पत्रकार प्रतिनिधी नेमणूक सुरू आहे.
आपण इच्छुक असाल तर खाली दिलेल्या नंबर वरती कॉल किंवा व्हॉट्सॲप करू शकता.
संपर्क : दै.चालु वार्ता, पुणे कार्यालय
Mob.: 9405617368 / 7447444962 / 7507503836
7887883863 / 7507505753 / 7219049014

# अवैध धंद्यांवर देगलूर पोलिसांची धडक कारवाई

## तीन जणांविरुद्ध गुन्हे ; ११ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
देगलूर - प्रतिनिधी
संतोष मंनधरणे



**देगलूर :** अवैध दारूविक्री व जुगार व्यवसायाविरोधात देगलूर पोलिसांनी बुधवारी (दि. ११) विशेष मोहीम राबवत तीन ठिकाणी धडक कारवाई केली. या कारवाईत तीन जणांविरुद्ध स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून एकूण ११ हजार ९५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांच्या या कारवाईमुळे अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर पोलिसांनी कडक भूमिका घेतल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या निर्देशानुसार राबविण्यात येत असलेल्या 'ऑपरेशन मासरेड' अंतर्गत देगलूर पोलिसांनी ही कारवाई केली. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी शहरातील विविध ठिकाणी छापे टाकून अवैध धंद्यांचा पर्दाफाश केला. पहिल्या कारवाईत गंगाधर गंगाराम भोसले (वय ७५) यांच्याकडून ७५ लिटर शिंदी जप्त करण्यात आली. जप्त करण्यात आलेल्या शिंदीची किंमत १ हजार ८७५ रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमांतर्गत त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसऱ्या कारवाईत नयुम शेख पि. मोईन शेख (वय ३६) हा सार्वजनिक ठिकाणी जुगार खेळताना आढळून आला. पोलिसांनी घटनास्थळी छापा टाकून जुगारासाठी वापरले जाणारे साहित्य तसेच रोख रक्कम जप्त केली. जप्त करण्यात आलेल्या साहित्याची किंमत ५८० रुपये असून त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

तिसऱ्या कारवाईत मारोती गंगाराम कुदरे (वय ५०) याच्याकडे अवैधरीत्या साठवून ठेवलेल्या मद्याच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. विविध ब्रँडच्या देशी व विदेशी मद्याचा समावेश असलेल्या या मुद्देमालाची किंमत ८ हजार ६४० रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले. या प्रकरणीही संबंधित कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या तिन्ही कारवायांमध्ये मिळून एकूण ११ हजार ९५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अवैध दारू विक्री व जुगार व्यवसायाला आळा घालण्यासाठी पोलिसांकडून सातत्याने कारवाया केल्या जात असून अशा प्रकारच्या बेकायदेशीर कृत्यांविरोधात पुढेही कठोर पावले उचलली जाणार असल्याचे पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे. ही कारवाई वरिष्ठ अधिकारी तसेच पोलीस निरीक्षक सुर्यमोहन बोलमवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत महिला पोलीस उपनिरीक्षक किरण बेंबडे, पोहेकॉ/२८२२ मोहन कनकवळे, पोहेकॉ/५२६ बालाजी पुरी, मपोहेकॉ/२६३८ शेख रिहाना, पोकॉ/३२१ गणेश बोदेमवाड, पोकॉ/३२११ अण्णाराव घुळे आणि पोकॉ/९७६ भालचंद्र ठाकूर यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संबंधित अधिकारी व अंमलदारांचे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडून कौतुक करण्यात येत आहे. अवैध व्यवसायांविरोधातील मोहीम यापुढेही अधिक प्रभावीपणे सुरू राहणार असून नागरिकांनी आपल्या परिसरात सुरू असलेल्या बेकायदेशीर कृत्यांची माहिती पोलिसांना देऊन सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

# टीम इंडियाचा आयर्लंड दौरा रद्द होणार?

## वैभव सूर्यवंशीचे आंतरराष्ट्रीय पदार्पण टळण्याची शक्यता; काय आहे कारण?

दै.चालु वार्ता वृत्तसेवा



**मुंबई :** आयर्लंडमध्ये स्थलांतरितांच्या (प्रवाशांच्या) विरोधातील निदर्शनांनी हिंसक रूप धारण केले आहे. या आठवड्यात बेलफास्टमध्ये झालेल्या चाकू हल्ल्याच्या घटनेनंतर लोकांना आपली घरे सोडून जावे लागले.दंगलीसारख्या परिस्थितीचा आगामी टी-२० मालिकेवरही परिणाम होऊ शकतो. या विषयावर क्रिकेट आयर्लंडने अधिकृत निवेदन जारी करून सांगितले होते की, ते सध्याच्या परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून आहेत आणि पुढील ४८ तासांत कोणताही निर्णय घेऊ शकतात.

भारतीय संघ लवकरच युके (UK) दौऱ्यावर जाणार आहे. भारत आणि आयर्लंड यांच्यात २६ जून आणि २८ जून रोजी दोन टी-२० सामने खेळवले जाणार आहेत आणि हे दोन्ही सामने बेलफास्टमध्येच होणार आहेत, जिथली परिस्थिती सध्या चांगली नाही. हिंसक निदर्शनांच्या पार्श्वभूमीवर आयर्लंड क्रिकेटने म्हटले आहे की, खेळाडू, प्रशिक्षक (कोच) आणि कर्मचारी (स्टाफ) यांची सुरक्षा ही त्यांची पहिली प्राथमिकता आहे.दुसरीकडे, 'दैनिक जागरण'च्या एका वृत्तानुसार, बीसीसीआयनेही (BCCI) नॉर्दर्न आयर्लंडमधील हिंसक घटनांवर बारीक लक्ष ठेवले आहे. जर परिस्थिती सुधारली नाही, तर सामन्यांचे ठिकाण (वेन्यू) बदलण्याचा विचार केला जाऊ शकतो.

यादरम्यान, चाहत्यांना वैभव सूर्यवंशीच्या आंतरराष्ट्रीय पदार्पणाची (इंटरनॅशनल डेब्यू) देखील प्रतीक्षा आहे, ज्याची आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी भारतीय संघात निवड करण्यात आली आहे. जर आयर्लंड किंवा इंग्लंडमध्ये वैभवला पदार्पणाची संधी मिळाली, तर तो सचिन तेंडुलकरचा विक्रम मोडून भारतीय संघासाठी आंतरराष्ट्रीय पदार्पण करणारा सर्वात तरुण खेळाडू ठरेल. तर दुसरीकडे, आयर्लंड दौऱ्यावर श्रेयस अय्यर पहिल्यांदाच भारतीय संघाचे नेतृत्व (कर्णधारपद) करताना दिसेल.

# दुखापतीमुळे हार्दिक पांड्याच्या कारकिर्दीवर संकट!

## तिन्ही फॉरमॅटमधून बाहेर पडल्याने पुनरागमनावर प्रश्नचिन्ह ?

दै.चालु वार्ता वृत्तसेवा



**मुंबई :** हार्दिक पांड्याच्या क्रिकेट कारकिर्दीवर सध्या संकटाचे सावट आहे. तो सध्या भारतीय संघातील कोणत्याही फॉरमॅटमध्ये खेळत नाही. हार्दिक बऱ्याच काळापासून कसोटी क्रिकेट खेळलेला नाही, आता तो वनडे टीममधूनही अचानक बाहेर झाला आहे आणि आगामी टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेसाठीही त्याची निवड झालेली नाही.त्यामुळे हार्दिक पुन्हा कधी आणि कसा कमबॅक करणार, याबद्दल आताच काही सांगता येणार नाही.

टीम इंडियाचा स्टार खेळाडू हार्दिक पांड्याने २०१६ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. त्याने २०१७ मध्ये कसोटीमध्ये पाऊल ठेवले, पण २०१८ नंतर त्याने एकही कसोटी सामना खेळला नाही. आपल्या ११ कसोटीच्या कारकिर्दीत त्याने ५३२ धावा केल्या, ज्यामध्ये एक शतक आणि चार अर्धशतकांचा समावेश आहे. वनडेबद्दल बोलायचे झाले तर, त्याने आपली शेवटचा वनडे सामना मार्च २०२५ मध्ये 'चॅम्पियन्स ट्रॉफी'च्या फायनलमध्ये खेळला होता.अफगाणिस्तानविरुद्धच्या तीन वनडे सामन्यांच्या मालिकेसाठी हार्दिकची निवड झाली होती, पण अट ही होती की तो पूर्णपणे फिट असावा. फिट होण्यासाठी तो एनसीए (NCA) मध्ये गेला आणि काही दिवसांत फिट झालाही, पण दुसऱ्याच दिवशी बातमी आली की त्याची जुनी दुखापत पुन्हा बळावली आहे. त्यामुळे तो अफगाणिस्तान मालिकेबाहेर झाला आहे. मात्र, यावर बीसीसीआयने अधिकृत अपडेट दिलेले नाही.

टी-२० हा हार्दिकचा सर्वात आवडता प्रकार आहे. त्याने मार्च २०२६ मध्ये न्यूझीलंडविरुद्ध शेवटचा टी-२० सामना खेळला होता, त्यानंतर तो आयपीएलमध्ये व्यस्त होता. आता बीसीसीआयने आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी टीम जाहीर केली, तेव्हा त्यात हार्दिकचे नाव नव्हते. याचा अर्थ तो सध्या टी-२० सुद्धा खेळणार नाही. आता हार्दिक पूर्णपणे तंदुरुस्त होऊन टीम इंडियात कधी परततो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# टीम इंडियासाठी आनंदाची बातमी! किंग कोहलीच्या फिटनेसबाबत मोठी अपडेट समोर

दै.चालु वार्ता वृत्तसेवा



**मुंबई :** भारत आणि अफगाणिस्तान (IND vs AFG) यांच्यातील वनडे मालिकेतून विराट कोहली बाहेर पडला आहे. आयपीएल २०२६ च्या फायनलमध्ये विराटच्या हॅमस्ट्रिंगला (मांडीचा स्नायू) दुखापत झाली होती. बीसीसीआयने अफगाणिस्तान मालिकेसाठी संघ जाहीर करताना स्पष्ट केले होते की, विराट फिट असेल तरच खेळू शकेल. मात्र, पूर्णपणे तंदुरुस्त नसल्यामुळे त्याला या मालिकेतून माघार घ्यावी लागली. पण आता चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे.

विराट कोहली हा भारतीय वनडे संघाचा सर्वात महत्त्वाचा फलंदाज आहे, त्यामुळे अफगाणिस्तानविरुद्ध त्याची उणीव नक्कीच भासेल. रिपोर्टनुसार, विराटची दुखापत वेगाने बरी होत आहे. तो सध्या रिहॅब (पुनर्वसन) प्रक्रियेत असून पुढच्या महिन्यात मैदानात परतण्याची दाट शक्यता आहे. रिपोर्टमध्ये असे म्हटले आहे की, इंग्लंडविरुद्धच्या वनडे मालिकेत विराट खेळताना दिसू शकतो. तसेच विराट सध्या दुखापतीतून सावरत असून, लवकरच त्याला बीसीसीआयच्या बेंगळुरू येथील 'सेंटर ऑफ एक्सलन्स'मध्ये (CoE) फिटनेस सिद्ध करावी लागेल. त्यानंतरच तो टीम इंडियासाठी पुन्हा वनडे खेळू शकेल. नुकतेच रोहित शर्मा आणि हार्दिक पांड्या यांनीही याच केंद्रात जाऊन फिटनेस टेस्ट दिली होती. त्याच प्रक्रियेतून विराटला जावे लागेल. त्यानंतर तो इंग्लंडविरुद्धच्या तीन वनडे सामन्यांच्या मालिकेत पुन्हा एकदा मैदानावर जलवा दाखवू शकेल.

# शेती विषय बाजार भाव माहिती

| शेतमाल | एकक | आवक | किमान (रु.) | कमाल (रु.) | सरासरी (रू.) |
|---|---|---|---|---|---|
| तांदुळ (बासमती) | क्विंटल | ७० | ८६०० | ११७०० | १०१५० |
| तांदुळ (कोलम) | क्विंटल | ५७२ | ४५०० | ७२०० | ५८५० |
| तांदुळ (मसूरी) | क्विंटल | ४८३ | ३००० | ३४०० | ३२०० |
| तांदुळ (इंद्रायणी) | क्विंटल | १३२ | ४५०० | ६५०० | ५५०० |
| गहु (लोकवन) | क्विंटल | २७९० | ३१०० | ४२०० | ३६५० |
| गहु (गुजरात विनाट) | क्विंटल | ६५९ | ३५०० | ४४०० | ३९५० |
| गहु (गुजरात तुकडी) | क्विंटल | ६१९ | ३४०० | ४५०० | ३९५० |
| गहु (सिहोर) | क्विंटल | ४४८ | ४७०० | ६४०० | ५५५० |
| ज्वारी (वसंत नं.९) | क्विंटल | ६२५ | ४२०० | ५३०० | ४७५० |
| ज्वारी (दुरी) | क्विंटल | ४६३ | ४००० | ४५०० | ४२५० |
| बाजरी (गावरान) | क्विंटल | ७२३ | २९०० | ३१०० | ३००० |
| बाजरी (संकरीत) | क्विंटल | ५०१ | ३२०० | ३४०० | ३३०० |
| बाजरी (महिको नं.९१०) | क्विंटल | ५४१ | ३४०० | ४००० | ३७०० |
| मिरची (ब्याडगी) | क्विंटल | ५२ | ३८००० | ४२००० | ४०००० |
| मिरची (गुंटूर) | क्विंटल | ४८ | २६००० | २९००० | २७५०० |
| मिरची (लवंगी) | क्विंटल | ४५ | २३००० | २४००० | २३५०० |
| वाटाणा (हिरवा) | क्विंटल | ४५ | ८००० | ९१०० | ८५५० |
| वाटाणा (पांढरा) | क्विंटल | ३९ | ४८०० | ६००० | ५४०० |
| मसूर | क्विंटल | ४६ | ७००० | ७८०० | ७४०० |
| धना (इंदौर) | क्विंटल | ४ | १२५०० | १३५०० | १३००० |
| धना (गावरान) | क्विंटल | ४ | ११००० | १२००० | ११५०० |
| हरभरा (चाफा) | क्विंटल | ४१ | ६४०० | ६८०० | ६६०० |
| हरभरा (संकरीत) | क्विंटल | ३८ | ६४०० | ७४०० | ६९०० |
| उडीद | क्विंटल | ६ | ९००० | १०१०० | ९५५० |
| मका (तांबडा) | क्विंटल | ४ | २४०० | २६०० | २५०० |
| चिंच (जुनी) | क्विंटल | ३ | १०५०० | ११५०० | ११००० |
| चिंच (नवी) | क्विंटल | ४ | ११००० | १२५०० | ११७५० |
| शेंगदाणे (घुंगरू) | क्विंटल | ७२६ | ११९०० | १२८०० | १२३५० |
| शेंगदाणे (जाडा) | क्विंटल | ४६७ | ११००० | १२६०० | ११८०० |
| हळद (राजापुरी) | क्विंटल | १ | २०००० | २३००० | २१५०० |
| मुग हिरवा | क्विंटल | ४० | ९००० | ९९०० | ९४५० |
| हुलगा | क्विंटल | ३ | ५६०० | ६००० | ५८०० |
| चवळी | क्विंटल | ६ | ८६०० | १०००० | ९३०० |
| नाचणी | क्विंटल | २ | ५२०० | ५५०० | ५३५० |
| गुळ (लाल) | क्विंटल | ३६६ | ४२०१ | ४३५१ | ४२७६ |
| गुळ (बॉक्स) | क्विंटल | ४१४ | ४२७५ | ४९२५ | ४६०० |

# हक्कासाठी लढायचे असेल तर 'कोर्ट कर्ज योजना' सुरू करा

## प्रशासनाच्या निष्क्रियतेवर संतप्त जनतेचा टोला!

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
रिसोड - प्रतिनिधी
विजय जुंजारे




**रिसोड :** लोकशाही व्यवस्थेत नागरिकांना न्याय मिळवण्यासाठी शासनाच्या विविध यंत्रणा कार्यरत असतात. तक्रारींचे निवारण, चौकशी आणि कारवाई ही जबाबदारी संबंधित प्रशासनाची असते. मात्र रिसोड तालुक्यात सध्या अशी परिस्थिती निर्माण झाल्याची चर्चा आहे की, सामान्य नागरिकांना आपल्या हक्कांसाठी लढण्यासाठी थेट न्यायालयात जाण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. परिणामी, 'कोर्टाच्या पायऱ्या चढण्यासाठीही आता कर्ज घ्यावे लागणार का?' असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीशी संबंधित विविध तक्रारी, निवेदने आणि अर्ज स्थानिक कार्यालयांपासून जिल्हास्तरीय कार्यालयांपर्यंत पोहोचल्याचे सांगितले जाते. अनेक प्रकरणांमध्ये वारंवार पाठपुरावा करूनही अपेक्षित निर्णय किंवा कारवाई होत नसल्याची भावना तक्रारदारांमध्ये आहे. त्यामुळे प्रशासकीय यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

नागरिकांचे म्हणणे आहे की, एखाद्या प्रकरणात तक्रार करायची, पुरावे द्यायचे, कार्यालयांचे उंबरठे झिजवायचे, निवेदने द्यायची आणि शेवटी न्यायासाठी कोर्टात धाव घ्यायची, हीच जर प्रक्रिया असेल तर प्रशासनाची भूमिका नेमकी काय? शासनाकडून पगार घेणाऱ्या अधिकाऱ्यांनी जनतेच्या प्रश्नांचे निराकरण करावे की फक्त फाईलींची देवाणघेवाण करावी, असा प्रश्न आता उघडपणे विचारला जात आहे.

परिस्थिती इतकी गंभीर झाल्याची चर्चा आहे की, काही नागरिक उपरोधिक भाषेत 'कोर्ट कर्ज योजना' सुरू करण्याची मागणी करूलागले आहेत. कारण न्यायालयीन लढाई म्हणजे मोठा आर्थिक खर्च. वकील शुल्क, न्यायालयीन फी, कागदपत्रांचा खर्च, प्रवास आणि वेळ याचा मोठा बोजा सामान्य माणसावर पडतो. त्यामुळे आपल्या हक्कासाठी लढताना अनेकांना कर्ज घेण्याची वेळ येत असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कथित भूखंड व्यवहार, मालमत्ता व्यवस्थापन, शेतकरी हिताच्या सुविधा आणि विविध आर्थिक बाबींवर अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. या संदर्भातील तक्रारींवर वेळेत निर्णय होत नसल्यामुळे नागरिकांमध्ये अस्वस्थता वाढत आहे. काहींच्या मते, प्रशासनाने योग्य वेळी कारवाई केली असती तर अनेक प्रकरणे न्यायालयापर्यंत पोहोचलीच नसती.

संतप्त नागरिकांचा आरोप आहे की, तक्रारींचे ढीग वाढत आहेत, मात्र निकालांची संख्या अत्यल्प आहे. त्यामुळे लोकांचा शासनावरील विश्वास डळमळीत होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. 'जनतेच्या प्रश्नांवर निर्णय होत नसतील तर लोकशाहीत सामान्य माणसाने न्याय कुणाकडे मागायचा?' असा सवालही उपस्थित होत आहे.

रिसोड तालुक्यात सध्या 'तक्रार करा, पाठपुरावा करा आणि शेवटी कोर्टात जा' अशीच व्यवस्था निर्माण झाली आहे का, याबाबत चर्चा रंगू लागली आहे. त्यामुळे संबंधित सर्व प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करून तक्रारींचा कालबद्ध निपटारा करावा, अशी मागणी जोर धरत आहे.

नागरिकांच्या मते, न्याय मिळवण्यासाठी कर्ज घेण्याची वेळ येणे ही कोणत्याही लोकशाहीसाठी अभिमानाची नव्हे तर चिंतेची बाब आहे. त्यामुळे शासन आणि प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन जनतेचा विश्वास पुन्हा जिंकावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. 'हक्कासाठी लढताना नागरिक कर्जबाजारी होत असतील, तर ही केवळ प्रशासनाची चूक नाही तर लोकशाही व्यवस्थेसमोरील गंभीर इशारा आहे,' अशी तीव्र प्रतिक्रिया आता जनतेमधून उमटत आहे.

Om Dental Care & Implant Centre
Shree nagar, Nanded.
डॉ. विवेक टापरे
बी.डी.एस.
मो. 9096968440
ओम
डेंटल इंम्प्लांट । रुट कॅनल । ऑर्थोडोंटीक
ॲडव्हान्स डेंटल हॉस्पीटल

पत्ता : राज मोहम्मद कॉम्प्लेक्स, पहनावा ड्रेसेस जवळ, मेन रोड, श्रीनगर, नांदेड.